दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

जिथे गाव.. तिथे वार्ताहर..!
महाराष्ट्रात
सातारा सांगली कोल्हापूर रायगड सिंधुदुर्ग
जिल्हा,तालुका,शहर आणि ग्रामीण भागामध्ये
पत्रकार /वार्ताहर,छायाचित्रकार आणि जाहिरातदार नेमनेआहेत.
दैनिक जनप्रभात सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
या लोकप्रिय वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
7875613619,883006884
पात्रता
१. समाजसेवेची आवड
२. जनसंपर्क
३. स्मार्ट फोन असणे आवश्यक
४. सोशल मीडियाचा वापर करता येणे
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

✻ (आष्टी) वर्धा ✻ शुक्रवार, २० मार्च २०२६ ✻ वर्ष ४ थे ✻ अंक ९३ ✻ पृष्ठ ६ ✻ मूल्य ५.०० RNI NO : MAHAR/2022/82242

'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' ही सौर क्रांती
– पालकमंत्री प्रकाश आबिटकर
महावितरणच्या विविध कामांचे लोकार्पण

कोल्हापूर, दि. १९: 'महावितरणकडून राबवण्यात येणारी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' ही एक सौर क्रांती असून यामुळे शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न व अडचणी पटकन सुटत आहेत. या योजनेमुळे शासनास शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज देणे शक्य होत आहे. शेतीला दिवसा पाणी देणे शक्य होत असल्याने शेतकऱ्यांचे रात्रीचे जागरण, जंगली प्राणी यांपासून सुटका झाली आहे. आता त्यांना कुटुंबासही वेळ देता येणार आहे. म्हणूनच ही एक क्रांतिकारक योजना असून याचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाते.' असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. महावितरणने वीज ग्राहकांच्या सेवा अधिक दर्जेदार करण्याच्या दृष्टीने गारगोटी, राधानगरी व आजरा उपविभागात १२४ कोटींची विविध कामे केली आहेत. या कामांचे प्रातिनिधिक स्वरुपात तांबाळे (ता.भुदरगड), कसबा वाळवा व धामोड (ता. राधानगरी) या तीन ठिकाणी लोकार्पण सोहळ्या प्रसंगी प्रकाश आबिटकर बोलत होते. यावेळी महावितरणचे मुख्य अभियंता स्वप्नील काटकर, अधीक्षक अभियंता गणपत लटपटे, पूनम रोकडे, कार्यकारी अभियंता दत्तात्रय भणगे, राधानगरी तहसीलदार अनिता



देशमुख, पंचायत समिती भुदरगडचे सभापती विक्रमसिंह पाटील, उपसभापती अरुणा देसाई, गोकुळचे संचालक नंदकुमार डेंगे, जिल्हा परिषद सदस्या सारिका नांदेकर, अरुण जाधव, परिसरातील आजी माजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, विविध गावांचे सरपंच मंचावर प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री आबिटकर म्हणाले, 'विविध सौर योजनांमुळे महावितरणवरील विजेचा अतिरिक्त ताण कमी होता आहे. पीएम सुर्यघर योजनेमुळे लोकांच्या घराचे वीजबिल शून्य होत आहे. त्यामुळे सौर योजनांचा नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा. भुदरगड व राधानगरी तालुक्यातील १२५ गावांतील शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत आहे. उर्वरित गावांकरिताचे काम प्रगतीपथावर असून लवकरच सर्व शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळेल. महावितरण अधिकारी-कर्मचारी हे अनेक नैसर्गिक संकटांचा सामना करत काम करतात. त्यांनी केलेल्या चांगल्या कामाचे कौतुकही आपण केले पाहिजे.' यावेळी पालकमंत्री आबिटकर यांनी केलेले काम नागरिकांपर्यंत पोहचवा, त्यांच्या अडचणी अधिक समरसतेने समजून घेऊन सुसंवाद वाढवा, असे आदेश महावितरण कर्मचाऱ्यांना दिले.

भुदरगड व राधानगरी तालुक्यात १२४ कोटींची कामे

महावितरणने विविध योजनांतून भुदरगड व राधानगरी तालुक्यात १२४ कोटींची कामे केली आहेत. यामध्ये प्रामुख्याने ७७ कोटींचे २२ मेगावॉटचे सौर ऊर्जा प्रकल्प उभा करणे, कसबा वाळवा(१०एमव्हीए) व गवसे-हरपवडे(५ एमव्हीए) येथे ७ कोटींचे नवीन रोहित्र उभा करणे, १४.२ कोटींचे काम करून विविध आठ ठिकाणांच्या उपकेंद्रांच्या रोहीत्रांची क्षमता वाढ करणे व अतिरिक्त रोहित्र उभा करणे यांचा समावेश होतो. याच बरोबर सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना व विशेष घटक योजनेतून ९.१८ कोटी खर्च करून ३६४ ठिकाणी विद्युत वाहिन्यांचे स्थलांतर करणे, नवीन वीज जोडणी योजनेतून ९.३५ कोटी खर्च करून ७६४ नवीन वीज ग्राहकांना वीज जोडणी देणे, विद्युत अपघात टाळण्याच्या दृष्टीने ३.५१ कोटी खर्च करून स्पेसर्स बसवणे, वितरण पेट्या बसवणे, गंजलेले पोल व तारा बदलणे आदी कामे करण्यात आली आहेत. कृषी आकस्मिक निधी योजनेतून ४.८० कोटी खर्च करून मासेवाडी(ता.आजरा) येथे ५ एमव्हीए क्षमतेचे नवीन उपकेंद्र उभा करण्यात आले आहे.

कार्यक्रमास विविध गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चार दिवस होऊनही सी डेट कंपनीच्या कामगाराचा ठिय्या कायमच
सी डेट कंपनीला आत मधून टाळा लावल्याने कर्मचाऱ्यानी गेट समोरच मांडला ठिय्या
कंपनीने कोणती प्रतिक्रियां न दिल्याने कंपनीचे प्रश्न गुलगत्याच बंद

तळेगाव प्रतिनिधी आष्टी तालुकातील तळेगाव श्यामजीपंत येथील सि डेट कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या वेतन वाढ व इतर मागण्याकरिता कंपनीला बच्चुभाऊ कडू च्या माध्यमातून दिनांक 11/ 2/ 2026 ला दिले होते निवेदन पण त्या निवेदनाचे कंपनीने कोणतेही उत्तर दिले नाही असे सी डेट प्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले त्यानंतर 14 मार्च रोजी कंपनीने पुरुष कर्मचाऱ्यांना सेकंड शिपला कंपनीत न घेतल्यामुळे सर्व कंपनी कर्मचाऱ्यांनी कंपनीच्या आत ठिय्या मांडला होता त्यामध्ये महिला कर्मचाऱ्यांचा सुद्धा समावेश होता दोन दिवस ठिय्या चालला त्यामध्ये चार महिला लो बीपी झाल्यामुळे दाखवण्यात न्याव्या लागल्या होत्या कंपनीच्या ठिय्यादरम्यान एक पुरुष अमरावती येथे उपचार करता नेण्यात आला होता त्यानंतर त्यावर प्रहार चे विधानसभा अध्यक्ष जय दादा बेलखडे यांच्या मार्गदर्शनात व ठाणेदार मंगेश भोयर यांच्या मध्यस्थीने थोडाफार तोडगा काढण्यात आला होता की आम्ही तुम्हाला जेवढे दिवस ठिय्या मांडला तेवढ्या दिवसाची रोजंदारी देऊ या मुळे सर्व कंपनी कर्मचारी मानले व नंतर दुसऱ्या



दिवशी तुम्ही नेहमीप्रमाणे कामावर यावे असा त्यावर तोडगा काढून सर्व कंपनी कर्मचारी आपापल्या घरी गेले त्यानंतर दिनांक 16 मार्च रोजी कामावर रुजू होण्याकरिता कंपनीमध्ये महिला व पुरुष आले असता कंपनी वाल्यांनी मेन गेटला कुलूप लावण्यात आले होते कोणालाही आत मध्ये घेण्यात आले नाही त्या दिवशी म्हणजे 16 मार्चला कामगार आयुक्त नागपूर लोया यांच्या दालनात मीटिंग घेण्यात आली यावेळेस कंपनीचे कर्मचारी व प्रहार संघटनेचे नेते जय दादा बेलखडे व कंपनीचे अधिकारी यांचे बैठक नागपूर येथे पार पडली पण कोणताही प्रकारचा तोडगा निघाला नाही कंपनी मानायला तयार नाही असे सी डेट प्रहार संघटनेच्या पदाधिकारी बोलले त्याच दिवशी कंपनीने टाळा लावल्यामुळे महिला व पुरुष कर्मचारी हे कंपनीच्या गेट पाशी ठिय्या मांडून बसले आहे चार दिवस लोटून सुद्धा तोडगा निघाला नसल्याने आमच्यावर व आमच्या परिवारावर उपासमारीची पाळी आलेली आहे तरी संबंधित विभागाने यावर तोडगा काढून आम्हाला न्याय देण्यात यावा व आमच्या मागण्या पूर्ण करण्यात याव्यात अशी प्रतिक्रिया बबन गाडगे व सर्व कर्मचाऱ्यांनी व महिलांनी दिली तसेच तिथे पोलिसांचा चोक बंदोबस्त लावण्यात आला त्यानंतर कंपनी अधिकाऱ्यांची प्रतिक्रिया घेण्यास आमचे प्रतिनिधी गेले असता प्रतिक्रिया उद्याला देईल असे सांगण्यात आले बातमी लिए पर्यंत कंपनीची कोणतीही प्रतिक्रिया मिळाली नाही प्रतिक्रिया बबन गाडगे सीडेड कंपनी कर्मचारी जर आमच्या मागण्या पूर्ण नाही करणार तर आम्ही आमरण ठिया मांडू तसेच काही कर्मचाऱ्यांना वीस वर्षे होऊन सुद्धा अठरा हजार रुपये मानधन देत आहे काही ठेकेदारी मध्ये आठ ते दहा हजार रुपये मानधन देत आहे त्यामुळे आम्ही आमच्या मागण्याचे पत्र दिले असे बबन गाडगे यांनी सांगितले

राज्यातील सर्व जमिनींच्या फेरफार नोंदी तपासणार !
० पुणे विभागातील फेरफार नोंद प्रकरणी दोषी महसूल अधिकाऱ्यांचे फौजदारी कारवाईसह निलंबन करणार
० अधिवेशन संपण्यापूर्वी ॲक्शन टेकन रिपोर्ट सादर करणार
० महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची परिषदेत घोषणा

मुंबई: दिलीप येवले
महसूल कायद्यातील कलम १५५ चा गैरवापर करून जमिनीच्या नोंदीत फेरफार करणाऱ्या आणि सर्वसामान्यांच्या जमिनी हडपणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर अतिशय कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच राज्यात असा प्रकार आणखी कुठे झाला याची सर्वंकष चौकशी करण्याचे आदेश दिले असून, आता पुणे जिल्ह्याप्रमाणेच राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील मागील पाच वर्षांतील कलम १५५ च्या आदेशांची चौकशी करून दोन महिन्यांत अहवाल सादर केला जाईल, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधान परिषदेत केली. सध्या पुणे विभागातीलच गैरव्यवहार पुढे आला असून, महाराष्ट्रातील अशा नोंदी तपासण्याचे आदेश सर्व विभागीय आयुक्ताना दिले आहेत. त्यानंतर हा प्रकार किती मोठा आहे, याची कल्पना येईल. पुणे विभागातील या अतिगंभीर प्रकरणांवर पुढील सात दिवसांत प्राथमिक कारवाई केली जाईल. हा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर सुरू असलेल्या अधिवेशनाचे कामकाज संपण्यापूर्वीच यावर केलेल्या कारवाईचा सविस्तर 'ॲक्शन टेकन रिपोर्ट' (एटीआर) सभागृहासमोर ठेवला जाईल, असे आश्वासनही महसूलमंत्री बावनकुळेयांनी सभागृहात दिले.प्राथमिक माहितीनुसार, राज्यातील सुमारे दीड ते दोन लाख कुटुंबांवर परिणाम झाल्याची शक्यता असून नागरिकांना न्याय मिळवून देणे हे शासनाचे प्राधान्य असल्याचे स्पष्ट करून दोषी अधिकारी कितीही मोठ्या पदावरील असले तरी त्यांच्यावर कारवाई टाळली जाणार नाही, असेही मंत्री बावनकुळे यांनी सभागृहात ठामपणे सांगितले. ॲड. अनिल परब यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, महसूल विभागातील कलम १५५ चा मोठ्या प्रमाणात गैरवापर झाल्याच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत. शुद्धलेखन दुरुस्तीसाठी असलेल्या तरतुदीचा वापर करून काही ठिकाणी जमिनीच्या मालकीत फेरफार करणे, क्षेत्रफळ कमी-जास्त करणे किंवा नोंदीत बदल करणे असे गंभीर प्रकार घडल्याचे तपासात आढळले आहे.

✻ चौकशी अहवालातील धक्कादायक वास्तव

विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या समितीने पुणे जिल्ह्यातील ३८,०२७ प्रकरणांपैकी २,३८३ प्रकरणांची प्रत्यक्ष तपासणी केली. त्यामध्ये ऑनलाईन ऐवजी ऑफलाईन अर्ज स्वीकारून घाईघाईने घेतलेले निर्णय.हितसंबंधितांना नोटिसा न बजावता दिलेले आदेश, भोगवटदार वर्ग-२ ची जमीन वर्ग-१ करणे आणि क्षेत्रफळात वाढ करणे, इतर हक्कातील व्यक्तींची नावे बेकायदेशीरपणे कमी करणे अशा बाबी निदर्शनास आले आहे. तपासात १५ अधिकारी अतिगंभीर, ८२ गंभीर आणि ५५ अधिकारी मध्यम स्वरूपाच्या अनियमिततेत दोषी आढळले असल्याची माहिती मंत्री बावनकुळे यांनी दिली.

✻ दोषींवर कठोर कारवाईचा बडगा

समितीच्या शिफारशीनुसार शासनाने कारवाई निश्चित केली आहे.'अ' वर्ग (अतिगंभीर) १३ प्रकरणांत फौजदारी कारवाई आणि कठोर विभागीय चौकशी होईल. 'ब' वर्ग (गंभीर) २४७ प्रकरणांत विभागीय चौकशी आणि संबंधित अधिकाऱ्यांची पुणे विभागाबाहेर अकार्यकारी पदावर बदली. 'अ' वर्गातील सर्व जबाबदार अधिकारी व कर्मचारी तसेच ३० पेक्षा जास्त अनियमितता आढळलेल्या अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात येणार आहे. ज्या प्रकरणांच्या संचिका (फाईल्स) गहाळ आहेत, त्यांच्यावर सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ नुसार फौजदारी कारवाई केली जाईल.

✻ राज्यासाठी नवीन धोरण आणि कायदा सुधारणा

महसूल मंत्र्यांनी सांगितले की, या घोटाळ्याची व्याप्ती लक्षात घेता राज्यातील सर्वच जिल्ह्यांत मागील ५ वर्षांतील कलम १५५ च्या आदेशांची तपासणी करण्याचे आदेश १३ फेब्रुवारी २०२६ रोजी देण्यात आले आहेत. तसेच, भविष्यात अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम १५५ मध्ये कायदेशीर सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहे. सदोष आढळलेले सर्व फेरफार कलम २५७ नुसार पुनरिक्षणात घेऊन तात्काळ दुरुस्त करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी पुणे यांना देण्यात आले आहेत.

चैत्र नवरात्री यात्रेला श्री महालक्ष्मी जगदंबा मंदिर कोराडी येथे भाविकांची गर्दी
जय माता दि जय माता दी गजराने दुमदुमला मंदीर परिसर



कोराडी (दिलीप येवले):- चैत्र नवरात्री तसेच गुढीपाडवा (मराठी नववर्ष) निमित्त हजारो भाविकांनी आई श्री महालक्ष्मी जगदंबेच्या मंदिरात मोठ्या श्रद्धेने दर्शन घेतले. मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी भाविकांनी आपल्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात यासाठी अखंड ज्योती प्रज्वलित केल्या. देवीच्या चरणी नतमस्तक होत भक्तांनी कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. अखंड मनोकामना एकुण ज्योती 2100 असूनअखंड मनोकामना ज्योती प्रज्वलन कार्यक्रमासाठी राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाधिकारी विपिन इटनकर, नानाभाऊ पडोळे यांनी सहपरिवार उपस्थित राहून जगदंबेचे दर्शन घेतले. अनेक प्रशासकीय पोलीस अधिकारी यांनी सहपरिवार देवीचे दर्शन घेतले. संस्थानाचे विश्वस्त मंडळ व मंदिर प्रशासनाकडून भाविकांसाठी योग्य व्यवस्था करण्यात आली होती. सुरक्षा, दर्शन रांग आणि स्वच्छता यांची विशेष काळजी घेण्यात आली होती. चैत्र नवरात्री आणि गुढीपाडव्याच्या पावन पर्वावर भाविकांचा उत्साह आणि भक्तीभाव पाहायला मिळाला.

संपादकीय...

गुढीपाडवा

नवचैतन्य, स्वाभिमान आणि नवसंस्कृतीचा उत्सव

भारतीय संस्कृतीत सण-उत्सव हे केवळ आनंदाचे क्षण नसतात; ते समाजाच्या इतिहासाचे, परंपरेचे आणि सामूहिक भावनांचे प्रतीक असतात. प्रत्येक सणामागे एखादी प्रेरणा, एखादा ऐतिहासिक संदर्भ आणि जीवनाला दिशा देणारा संदेश दडलेला असतो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान असलेला सण म्हणजे गुडीपाड़वा. हा दिवस केवळ नवीन वर्षाचा प्रारंभ नाही, तर नवचैतन्य, नवउमेद आणि नव्या आशेचा आरंभ आहे. वसंत ऋतूच्या आगमनासोबत येणारा गुढीपाडवा हा सण भारतीय संस्कृतीच्या जीवनदायी परंपरेचे प्रतीक आहे. निसर्गात जशी नवपालवी फुटते, तशीच नव्या वर्षाची सुरुवात जीवनात नवीन संधी, नवीन विचार आणि नवीन ऊर्जा घेऊन येते. म्हणूनच गुढीपाडवा हा केवळ धार्मिक सण नाही; तो आशावाद, पुनरुत्थान आणि सकारात्मकतेचा उत्सव आहे. भारतीय पंचांगानुसार चैत्र शुद्ध प्रतिपदेला नवीन वर्षाची सुरुवात होते. याच दिवशी महाराष्ट्रात गुढीपाडवा साजरा केला जातो. हा दिवस उगड़ी म्हणून आंध्र प्रदेश आणि कर्नाटकात साजरा होतो, तर उत्तर भारतात याच काळात चैत्र नवरात्री सुरू होते. यातून भारतीय संस्कृतीची एक महत्त्वाची वैशिष्ट्य दिसते, भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधतेतूनही एकात्मतेची भावना. भारताच्या विविध भागात नाव वेगवेगळी असली तरी नववर्षाचे स्वागत करण्यामागची भावना एकच आहे नवीन सुरुवात, नव्या आशा आणि नव्या शक्यता. गुढीपाडव्याच्या दिवशी घराच्या प्रवेशद्वारावर उभारली जाणारी गुढी ही विजय, समृद्धी आणि स्वाभिमानाचे प्रतीक मानली जाते. बांबूच्या काठीवर रेशमी वस्त्र, साखरेची गाठी, कडुलिंबाची पाने आणि वर तांब्याचा किंवा चांदीचा कलश लावून गुढी उभारली जाते. ही गुढी केवळ धार्मिक परंपरा नाही; ती विजयाचा आणि सकारात्मकतेचा ध्वज आहे. घराच्या दाराशी उभारलेली गुढी जणू सांगत असते, अडचणी कितीही असल्या तरी आशेचा ध्वज उंच ठेवावा. गुढीपाडव्याशी अनेक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भ जोडलेले आहेत. काही परंपरांनुसार हा दिवस इतिहासकारांच्या मते शिवाजी यांच्या विजयाचे प्रतीक म्हणूनही गुढी उभारली जाते. या संदर्भांचा अर्थ इतकाच गुढी म्हणजे विजयाचा ध्वज. अन्याय, पराभव किंवा संकटावर मात करून उभे राहण्याची प्रेरणा या सणातून मिळते. गुढीपाडवा हा सण निसर्गाशीही अतूटपणे जोडलेला आहे. चैत्र महिन्यात निसर्गात नव्या पालवीचे आगमन होते. झाडांना नवी पाने फुटतात, फुलांचा सुगंध दरवळतो, वातावरणात ताजेपणा भरतो. हा निसर्गाचा संदेश आहे, जीवनात कितीही कठीण काळ आला तरी नव्या सुरुवातीची संधी नेहमी असते. म्हणूनच गुढीपाडवा हा निसर्गाशी एकरूप होऊन नव्या जीवनाचा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. सण हे समाजाला एकत्र आणण्याचे माध्यम असतात. गुढीपाडव्याच्या दिवशी लोक एकमेकांना भेटतात, शुभेच्छा देतात, आनंद वाटून घेतात. आजच्या धकाधकीच्या जीवनात माणसांमधील संवाद कमी होत चालला आहे. तंत्रज्ञानाने अंतर कमी केले असले तरी मनांमधील दुरावा वाढत आहे. अशा वेळी गुढीपाडवा आपल्याला स्मरण करून देतो, समाजाचा खरा आधार म्हणजे परस्परांचे नाते आणि विश्वास. आजचा काळ वेगवान बदलांचा आहे. तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि जीवनशैली झपाट्याने बदलत आहे. या बदलांच्या प्रवाहात अनेकदा आपली सांस्कृतिक परंपरा मागे पडताना दिसते. सण-उत्सव अनेकदा केवळ औपचारिकतेपुरते मर्यादित राहतात. परंपरेचा अर्थ न समजता केवळ विधी पार पाडले जातात. मात्र गुढीपाडवा आपल्याला सांगतो, सण साजरा करण्याचा खरा अर्थ म्हणजे जीवनात सकारात्मकता, मूल्ये आणि सांस्कृतिक अभिमान जपणे. गुढीपाडवा म्हणजे केवळ शुभेच्छा देण्याचा दिवस नाही; तो नवीन संकल्प करण्याचा दिवस आहे. समाज म्हणून आपण स्वतःला प्रश्न विचारायला हवा, आपण अधिक संवेदनशील समाज घडवत आहोत का? आपण सामाजिक समतेच्या दिशेने पावले टाकत आहोत का? आपण पर्यावरणाचे रक्षण करत आहोत का? नवीन वर्षाचा खरा अर्थ म्हणजे केवळ कालगणनेचा बदल नाही, तर विचारांचा आणि कृतीचा बदल. जागतिकीकरणाच्या या युगात अनेक संस्कृती एकमेकांशी मिसळत आहेत. हे सकारात्मक असले तरी आपल्या संस्कृतीची ओळख जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे. गुढीपाडवा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा सण आहे. या सणातून आपली परंपरा, आपले मूल्य आणि आपली सांस्कृतिक ओळख जपली जाते. गुढीपाडवा हा सण आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो, जीवनात कितीही संकटे आली तरी आशेचा ध्वज उंच ठेवावा. गुढी म्हणजे विजयाचे प्रतीक, नववर्ष म्हणजे नव्या संधींचा प्रारंभ आणि हा सण म्हणजे जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याची प्रेरणा. आजच्या बदलत्या काळात गुढीपाडव्याचा खरा अर्थ समजून घेतला तर हा सण केवळ परंपरा राहणार नाही; तो समाजाला दिशा देणारा प्रेरणादायी उत्सव ठरेल. नवीन वर्ष आपल्यासाठी प्रगती, समता, आनंद आणि समृद्धी घेऊन येवो, समाजात बंधुभाव वाढो आणि प्रत्येकाच्या आयुष्यात नवचैतन्य फुलो, हीच या मंगल दिनी अपेक्षा. गुढीपाडव्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

महाडचा धर्मसंग्राम व सामाजिक समतेची मुहूर्तमेढ

(20-26 मार्च: चवदार तळे सत्याग्रह दिन तथा भारतीय सामाजिक सबलीकरण दिवस विशेष.)



महाड चवदार तळे सत्याग्रह हा २० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथे दलितांना सार्वजनिक चवदार तळ्याचे पाणी वापरण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी केलेला ऐतिहासिक सत्याग्रह होता. हा लढा केवळ पाण्यासाठी नसून मानवी हक्क आणि विषमतेविरुद्ध होता, जो सामाजिक समतेची मुहूर्तमेढ ठरला. या दिनाचे औचित्य साधून दि.२० मार्च हा भारतात "सामाजिक सबलीकरण दिन" म्हणूनही साजरा केला जातो. श्री कृष्णकुमार आनंदी- गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर महत्त्वपूर्ण व उद्‌बोधक संकलित लेख जरूर वाचा.... संपादक.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेच्या रुपाने आधुनिक भारताचा पाया रचला. स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेवर आधारित भारतीय समाजाची नवरचना करण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले. या देशाला स्वातंत्र्य तर मिळेल; परंतु जातिभेद, उच्चनीचता आणि अस्पृश्यतेच्या बेड्यांमध्ये समाजातील बहुसंख्य वर्ग जखडून राहिला, तर हे स्वातंत्र्य नावापुरतेच राहण्याचा धोका त्यांना दिसत होता. हे चित्र बदलण्यासाठी बाबासाहेबांनी ज्या सामाजिक समतेच्या चळवळीची पायाभरणी केली, तिची सुरुवात महाडला झालेल्या धर्मसंगरात झाली. दि.२० मार्च १९२७ रोजी त्यांनी हजारो अनुयायांसह चवदार तळ्याचे पाणी ओंजळीत घेऊन प्यायले आणि आपल्या अस्पृश्य बांधवांचा माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा मूलभूत हक्क प्रस्थापित केला. या घटनेचे स्मरण करून सामाजिक समता व ऐक्याची चळवळ सातत्याने पुढे नेण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आपण मागील तीन वर्षांपासून साजरा करत आहोत. स्वातंत्र्याच्या लढ्यात "राजकीय स्वातंत्र्य की सामाजिक सुधारणा" असा प्रश्न सतत वेगवेगळी रूपं घेऊन आपल्यासमोर उभा राहात आला आहे. या प्रश्नाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी निर्णायक उत्तर दिले, ते अस्पृश्यांच्या राजकीय व सामाजिक हक्कांसाठीची चळवळ उभारून. बाबासाहेबांना जातिभेद व अस्पृश्यतेचे चटके लहानपणापासून सहन करावे लागले. अमेरिकेत उच्च शिक्षण घेऊन भारतात परतल्यावरही बडोद्यासारख्या संस्थानात त्यांना रहायला घर मिळाले नाही की सन्मानाची वागणूक मिळाली नाही. जातिभेदांच्या उतरंडीवर आधारित विषमतायुक्त समाजव्यवस्था ही त्याला कारणीभूत असल्याची जाणीव त्यांना सतत होत होती. डॉ.बाबासाहेबांनी कोलंबिया विद्यापीठात सन १९१६मध्ये 'जातींची उत्पत्ती, जडणघडण आणि विकास' या विषयावर लिहिलेल्या निबंधापासून ते सन १९५६मध्ये बुद्ध धम्माचा स्वीकार करण्यापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी समतेसाठी उभारलेल्या लढ्याचे अंतःसूत्र आपल्याला दिसते. ही लढाई अस्पृश्यतेच्या निवारणाची, मूलभूत मानवी हक्कांची, समतायुक्त समाजाच्या उभारणीची आणि राष्ट्राच्या घडणीची असल्याचे स्पष्ट भान त्यांच्याकडे होते. त्यामुळेच महाडच्या सत्याग्रहाची 'धर्मसंग्राम' अशी मांडणी करताना या लढाईत आपल्याबरोबर जे येतील, त्या सर्वांना सोबत घेण्याची भूमिका त्यांनी ठेवली. मुंबई प्रांतिक सभेत रावबहादूर सी. के. बोले यांच्या पुढाकाराने सार्वजनिक शाळा, धर्मशाळा व पाणवठे सर्वांसाठी खुले करण्याचा ठराव सन १९२३मध्येच संमत झाला होता. याला अनुसरून महाडचे नगराध्यक्ष सुरबानाना टिपणीस यांनीही नगरपरिषदेत तसा ठराव केला होता. सन १९२४मध्ये बहिष्कृत हितकारिणी सभेच्या स्थापनेनंतर बाबासाहेबांनी या प्रश्नावर आंदोलन करायचे ठरवले, तेव्हा त्यांनी महाडच्या चवदार तळ्याची सत्याग्रहासाठी निवड केली.त्यासाठी १९ व २० मार्च १९२७ रोजी कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेचे आयोजन करण्यात आले, तेव्हा हजारो अस्पृश्य बांधवांबरोबरच स्वतः टिपणीस, अनंतराव चित्रे, गंगाधर सहस्रबुद्धे, बापूसाहेब जोशी, तुळजाराम मीठा, भाईशेठ वडके, शांताराम पोतनीस आदी मंडळींचा त्यात हिरीरीने सहभाग होता. ज्या तळ्यावर गुरेढोरे व अन्य धर्मीयांनाही पाणी पिण्याची मुभा होती, तिथे अस्पृश्यांना मात्र येण्यास बंदी होती. ती झुगारून बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली हजारो अनुयायी चवदार तळ्याच्या काठी आले आणि त्याचे पाणी पिऊन आपला माणूसपणाचा मूलभूत हक्क प्रस्थापित केला. यामुळे संतप्त झालेल्या सनातन्यांनी वीरेश्वर मंदिरात हे लोक आता घुसतील, अशी आवई उठवून परतणाऱ्या सत्याग्रहींवर हल्ला चढवला. अनेकांची डोकी फुटली. मंडपातील जेवणातही माती कालवण्यात आली. मात्र, बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांना शांत राहण्यास बजावल्यानेच पुढचा दुर्धर प्रसंग टळला होता. डॉ. बाबासाहेबांनी 'बहिष्कृत भारता'तील लेखांमध्ये आणि या काळातील भाषणांमध्ये आपली भूमिका रोखठोकपणे मांडली होती. या लेखाच्या मर्यादेत त्याचा व्यापक वेध घेणे शक्य नाही. परंतु, ही चळवळ केवळ अस्पृश्यांच्या आत्मोद्धाराची नसून, मानवधर्मोद्धाराची असल्याचे त्यांनी ठासून सांगितले आहे. आपले हे कार्य लोकसंग्रहाचे आहे, असे सांगून बाबासाहेब लिहितात, "अस्पृश्यतेमुळे केवळ अस्पृश्यांचेच नुकसान झाले नसून, स्पृश्यांचे व देशाचेही अपरिमित नुकसान झाले आहे. ... त्यांना आत्मसामर्थ्य प्राप्त झाले, तर ते आपली उन्नती करतील व आपल्या पराक्रमाने, बुद्धीने, उद्योगाने देशाच्या भरभराटीस कारणीभूत होतील." पुढे डिसेंबर १९२७मध्ये महाडमध्ये झालेल्या परिषदेत मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. त्यासंबंधीचा ठराव गंगाधर सहस्रबुद्धे यांनी मांडला आणि त्यांच्याच हस्ते ही होळी करण्यात आली. मात्र, याच परिषदेत स्वतः डॉ. बाबासाहेबांनी "हिंदूमात्राचा जन्मसिद्ध हक्कांचा जाहीरनामा' मांडला, हे अनेकांना माहिती असत नाही. ''सर्व माणसे जन्मतः समान दर्जाचीच आहेत व ती मरेपर्यंत समान दर्जाचीच आहेत'', यासारखी या जाहीरनाम्यातील काही तत्त्वे पुढे भारतीय राज्यघटनेच्या रुपाने या देशाला पुढे नेणारी ठरली, याची नोंद घेणे त्यामुळेच आवश्यक ठरते, हे वेगळे सांगणे नकोच ! या प्रसंगीच्या एका भाषणात डॉ. बाबासाहेब म्हणतात, ''...यास्तव हिंदू समाज समर्थ करावयाचा असेल, तर चातुर्वर्ण्य व असमानता यांचे उच्चाटन करून हिंदू समाजाची रचना एकवर्णत्व व समता या दोन तत्त्वांच्या आधारे केली पाहिजे. अस्पृश्यता निवारणाचा मार्ग हा हिंदू समाज समर्थ करण्याच्या मार्गापासून भिन्न नाही. म्हणून मी म्हणतो की, आपले कार्य जितके स्वहिताचे आहे, तितकेच राष्ट्रहिताचेही आहे." महाडचे धर्मयुद्ध आणि इतरही अनेक निमित्त्यांनी बाबासाहेबांनी भारतीय समाज आणि हिंदू धर्माची कठोर चिकित्सा केली आहे. त्यामागे या देशातील सामाजिक ऐक्य दृढ व्हावे, हीच भावना आपल्याला सातत्याने दिसते. तत्कालीन समाजाला त्याचे भान अनेकदा असत नाही. चवदार तळ्यावर सत्याग्रह करून परतणाऱ्यांवर हल्ला करणाऱ्या महाडमधील तत्कालीन लोकांनाही ते नव्हते. पण, कालांतराने डॉ.बाबासाहेबांच्या कार्याची व्यापकता व महत्त्व लक्षात आल्यानंतर याच महाड नगरपरिषदेने सन १९४० आणि १९४२ मध्ये सन्मानपत्र देऊन त्यांचा दोनदा सत्कार केला, याचीही नोंद आवर्जून घेतली पाहिजे. (विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !)॥॥



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप-
९४२३७१४८८३.

महाड चवदार तळे सत्याग्रह दिन तथा भारतीय सामाजिक सबलीकरण दिन निमित्त समस्त भारतीय बांधवांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी ॥॥

पाडवा सण ...

साजरा गुढी पाडवा
जाणूनखरी संस्कृती
विक्रम संवत निर्मी
भास्कराचार्य गणिती

वनवास सरे रामाचा
निघाले अयोध्दे प्रति
राज्याभिषेक सोहळा
सुशोभित सार्थनृपती

क्रुरकौरव गेले लयास
सुखे नांदे द्रौपदी पति
सिंहासनावर धर्मराज
पांडव राज्य अधिपती

संत झुलेलाल प्रकटे
त्या सिंधसमाज प्रांती
महर्षी दयानंद करती
आर्य समाज निर्मीती

शिख द्विवतीय गुरूवर्य
अंग देवजी ये जगती
ब्रह्म पुराणातील नोंदी
झालीविश्वाची उत्पत्ती

पीत पर्णे गळून पडती
सुखावे हरित आकृति
जीवन चक्र जाणून घे
नवभरती अन् निवृत्ती

वसंतऋतु होई आरंभ
पल्लवीनव्याने धारती
रात्र लहान दिस मोठा
नव प्रारंभ करी धरती

– हेमंत मुसरीफ पुणे
9730306996

सण ..

नेसवता साडी चोळी
ती साधी सरळकाठी
उभी केली मस्त गुढी
गळा साखरेची गाठी

कडूनिंबाची पाने कडू
रे सृदृढ आरोग्यांसाठी
पाडव्याचा सण मोठा
जेंव्हाशेजारीसुखदाटी

पक्वान्नेप्रसाद वाटूया
दे गरीबा श्रीखंडवाटी
निमित्ताने जेवणावळ
सुग्रास भुकेल्या पोटी

सर्वांसांगे साखरगाठी
कटू शब्द नको ओठी
जे जे भले सारे घ्यावे
संस्कृती आपले पाठी

नवा अध्याय कोरावा
रे स्वच्छ मनाची पाटी
पिवळी पाने ढाळता
होई हिरवत्वाची दाटी

जाणा सण सार्थ अर्थ
जागृत सदैव अंतर्दृष्टि
ही ईश्वरोपाधि समष्टि
कळे जीवोपाधि व्यष्टि

पर्यावरणास जपायचे
आशीर्वाद देईलं सृष्टी
पाडवा नव संवत्सरी
बदलूया आपली दृष्टी

– हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996

जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या जिल्हा सांप्रदायाच्या वतिने नविन वर्षाच्या निमित्ताने समुद्रपूर शहरात भव्य शोभायात्रा

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे

समुद्रपूर:- शहरात अनंत विभुषीत जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या जिल्हा सांप्रदायाच्या कृपा आशीर्वादाने व परमपुज्य कानीफनाथ महाराज यांच्या प्रेरणेने दरवर्षी प्रमाणे नुतन याही वर्षी गुढी पाडवा निमित्ताने वर्धा जिल्ह्याची शोभायात्रा समुद्रपूर शहरात आज दिनांक १९ मार्च २०२६ रोजी सकाळी ठीक १०.०० श्री हनुमान मंदिर वार्ड नंबर ४ येथून हि शोभायात्रा काढण्यात आली होती यावेळी या शोभायात्रा मध्ये जिल्ह्यातील सर्व आजीमाजी पदाधीकारी सर्व कार्यकर्ते , महीला सेना, युवा सेना, संग्राम वार्डा वार्डातुन ही शोभायात्रा काढण्यात आली होती यावेळी



सेना, संपूर्ण गुरुबंधु गुरुभगीणी यांनी सहभागी घेऊन ही गुढी पाडवा शोभायात्रा अतीशय सुंदररित्यापार पाडली आहे यावेळी या शोभायात्रेत भजन मंडळ बॅड पथक महिल्यांच्या डोक्यावर कलश व गुडी उभारुन शहराच्या मुख्य मार्गावरून ते शहरात गावातील हि पहिली शोभायात्रा असल्याने गावातील नागरिकांनी या गुडी पाडव्याच्या शोभायात्रा पाहायला तोभा गर्दी केली होती. तर सर्व महिलांना कलश, गुढी घेऊन काठापदराच्या साड्या परिधान करून शोभायात्रे मध्ये सहभागी झाल्या होत्या.तर अंनत विभुषित जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्र महाराज यांच्या बॅनर लावून निशाणधारी महीला व पुरुष, ढोल पथक, कळसधारी महीला श्रीराम पंचायतन, भगवे झेंडे घेऊन देखावे दाखवुन, भजन मंडळी, प पु जगद्गुरू श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज माऊलीचा रथ सर्व भक्त मंडळी एका ठिकाणी येऊन हि भव्यदिव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. तर या शोभायात्रा ची सांगता : गजानन महाराज मंदिर आठवडी बाजार समुद्रपूर येथे संपन्न करुन महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) **RNI NO : MAHMAR/2022/82242**

सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचा १०६५.२४ कोटींचा अर्थसंकल्प सादर

(प्रदीप जोशी, सांगली जिल्हा प्रतिनिधी) :

सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगर पालिकेचा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा १०६५ कोटी २४ लाख रुपयांचा मूळ अर्थसंकल्पीय अंदाज आयुक्त श्री. सत्यम गांधी (भा.प्र.से.) यांनी स्थायी समितीच्या प्रथम सभेत सादर केला. 'शाश्वत विकास' हा केंद्रबिंदू मानून तयार करण्यात आलेल्या या अंदाजपत्रकात शहराच्या इतिहासात प्रथमच 'नील अर्थव्यवस्था' (Blue Economy) आणि 'हरित अर्थव्यवस्था' (Green Economy) या आधुनिक संकल्पनांचा समावेश करण्यात आला आहे.प्रस्तावित महसुली जमा: आगामी वर्षात ४३३.५७ कोटी रुपये महसुली जमा अपेक्षित आहे. यामध्ये प्रामुख्याने जीएसटी (GST) अनुदान (२७४.५० कोटी) आणि मालमत्ता कराचा (९३.७४ कोटी) समावेश आहे. आस्थापना व नागरी सेवा खर्च: वाढत्या नागरी विस्तारानुसार कर्मचारी पगार, भत्ते आणि अनिवार्य सेवांसाठी २३२.३२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.'नील-हरित' (Blue-Green) विकास धोरण:पर्यावरण संवर्धन आणि हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रशासनाने विशेष आर्थिक तरतूद केली आहे: नील अर्थव्यवस्था (३३.६४ कोटी): कृष्णा नदी प्रदूषण मुक्ती प्रकल्प, जलशुद्धीकरण केंद्रांचे ऊर्जा ऑडिट आणि भारतनगर सरोवर पुनरुज्जीवन (४.६८ कोटी) यांसारख्या जलस्रोत संरक्षणाच्या कामांना प्राधान्य दिले जाईल.हरित अर्थव्यवस्था (५७.६० कोटी): कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी स्मार्ट एल.ई.डी. पथदिवे (२५ कोटी), प्रधानमंत्री ई-बस सेवा (७.८४ कोटी) आणि मनपा इमारतींवर सौर ऊर्जा प्रकल्पांची उभारणी करण्यात येईल. नागरी सेवांसाठी प्रशासकीय अर्थसहाय्य (Grant-in-aid): महानगरपालिकेने अत्यावश्यक लोकसेवांचा दर्जा राखण्यासाठी महसुली उत्पन्नातून मोठ्या प्रमाणावर तरतूद केली आहे: पाणीपुरवठा: शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी लागणाऱ्या अतिरिक्त २३.८५ कोटी रुपयांच्या खर्चाचा भार प्रशासनाने स्वतः पेलला आहे. आरोग्य व स्वच्छता: घनकचरा व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्यासाठी ४०.०५ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी प्रस्तावित आहे.दिवाबत्ती व्यवस्था: संपूर्ण शहरातील दिवाबत्तीचा ४१.१० कोटी रुपयांचा वार्षिक खर्च प्रशासकीय महसुलातून पूर्ण केला जाईल. आगामी वर्षातील धोरणात्मक प्रकल्प: पर्यायी महसूल स्रोत: महापालिकेच्या मालकीच्या भूखंडांवर स्वतःचे पेट्रोल व सीएनजी पंप सुरू करून बिगर-कर उत्पन्न वाढवण्यावर भर दिला जाईल.सांस्कृतिक विकास: सांगलीच्या सांस्कृतिक चळवळीला बळ देण्यासाठी हनुमाननगर येथे ३० कोटी खर्चाच्या सुसज्ज नाट्यगृहाची निर्मिती केली जाईल.डिजिटल प्रशासन: प्रशासकीय पारदर्शकता वाढवण्यासाठी ई-ऑफिस (Paperless Office) प्रणालीची १००% अंमलबजावणी करण्यात येईल. मालमत्ता मुद्रीकरण : मनपाच्या पडीक मालमत्ता व गाळे भाडेतत्वावर देऊन आर्थिक स्वावलंबित्व मिळवण्याचे धोरण राबवले जाईल.स्थायी समितीचे महत्त्वाचे प्रशासकीय निर्णय:अर्थसंकल्प सादरीकरणासह आजच्या सभेत खालील तांत्रिक कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली: हिराबाग जलशुद्धीकरण केंद्र: इमारत बळकटीकरणासाठी २८.२५ लाख रुपयांच्या निविदेला मंजुरी. मिरज शहर सौंदर्यीकरण: ५० लाख रुपये खर्चून विविध चौकांमध्ये हायमास्ट (दीपस्तंभ) उभारले जातील.वखारभाग ड्रेनेज व्यवस्था: मलनिःसारण पंपिंग स्टेशनसाठी ५५.२७ लाख खर्चून नवीन ६३० KVA ट्रान्सफॉर्मर बसवला जाईल. आयुक्त सत्यम गांधी यांनी सांगितले की "हा अर्थसंकल्प शहराच्या शाश्वत भविष्याचा पाया आहे. 'डेटा-आधारित' नियोजन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सांगली, मिरज व कुपवाड शहरांना पर्यावरणपूरक आणि स्मार्ट सिटी म्हणून विकसित करण्याचा आमचा मानस आहे. पायाभूत सुविधांच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता पारदर्शक कारभारावर आमचा भर राहील."सदर सभेला सर्व स्थायी समिती सदस्य, अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे, उपायुक्त स्मृती पाटील, उपायुक्त अश्विनी पाटील सर्व विभाग प्रमुख आणि महापालिका सचिव सहदेव कावडे उपस्थित होते.

सांगली मनपा शिक्षण विभागातील प्रभारी लेखापालाचे निलंबन;

आर्थिक अनियमितता आणि दप्तर दिरंगाईवर आयुक्तांची कठोर कारवाई

(प्रदीप जोशी, सांगली जिल्हा प्रतिनिधी) : सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील कामकाजात गंभीर आर्थिक अनियमितता, वरिष्ठ आदेशांची अवमानना आणि दप्तर दिरंगाई केल्याप्रकरणी श्री. गजानन प. बुचडे (प्रभारी मुख्य लिपिक तथा लेखापाल) यांना महापालिका आयुक्त श्री. सत्यम गांधी यांनी तातडीने सेवेतून निलंबित केले आहे. प्रशासकीय शिस्त आणि पारदर्शकतेशी तडजोड करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध आयुक्तांनी उचललेल्या या पावलामुळे मनपा वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. आर्थिक अनियमितता व पीएफ रेकॉर्डमध्ये त्रुटी: कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे (PF) रजिस्टर मागील ७ ते ८ वर्षांपासून अद्ययावत नसल्याचे निदर्शनास आले आहे. ब्रॉडशीट आणि लेजर बुक अपूर्ण असल्याने आर्थिक रकमांचा ताळमेळ लागत नसल्याचे गंभीर प्रकरण समोर आले आहे.वैद्यकीय बिले प्रलंबित ठेवणे: सन २०२१ पासूनचे कर्मचारी व शिक्षकांचे वैद्यकीय देयकांचे प्रस्ताव जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवून, कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान केल्याचा ठपका श्री. बुचडे यांच्यावर ठेवण्यात आला आहे.आदेशांचे उल्लंघन व टपाल दिरंगाई: शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर आणि मनपा प्रशासनाने वेळोवेळी दिलेल्या लेखी सूचनांकडे दुर्लक्ष करणे आणि शासकीय टपालाचा वेळेत निपटारा न केल्याने प्रशासकीय कामकाजात अडथळे निर्माण झाले.असमाधानकारक खुलासा: प्रशासनाने बजावलेल्या दोन 'कारण दाखवा' नोटिसींना त्यांनी दिलेला खुलासा वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा आणि असमाधानकारक आढळल्याने ही कठोर कारवाई करण्यात आली.महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींनुसार ही कारवाई करण्यात आली आहे. निलंबन काळात श्री. बुचडे यांचे मुख्यालय महापालिका मालमत्ता विभाग येथे निश्चित करण्यात आले असून, त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी देखील प्रस्तावित करण्यात आली आहे. कारवाईबाबत भूमिका स्पष्ट करताना आयुक्त म्हणाले की,"महानगरपालिका प्रशासनात 'सेवा हक्क हमी कायद्या'चे उल्लंघन आणि आर्थिक बाबींत निष्काळजीपणा करणाऱ्या कोणत्याही अधिकारी वा कर्मचाऱ्याची गय केली जाणार नाही. सर्व विभागांनी प्रलंबित कामांचा तातडीने निपटारा करावा, अन्यथा अशाच प्रकारची कठोर कारवाई करण्यात येईल."या कारवाईमुळे शिक्षण विभागातील प्रलंबित फाईल्स आणि कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न आता मार्गी लागण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.



आदरणीय अजितदादांच्या स्मरणार्थ मुस्लिम समाजातील गरजू कुटुंबांना रमजान ईद निमित्त शिरखुर्म्यासाठी लागणाऱ्या साहित्याचे वाटप

सातारा/अस्लम सुतार:

राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे सातारा जिल्हाध्यक्ष शफीक शेख यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी भवन, सातारा येथे करण्यात आले.यावेळी बोलताना शफीक शेख म्हणाले की, आदरणीय साहेब आणि त्यांच्या पावलावर पाऊल ठेवणारे आदरणीय अजितदादा यांचे दुर्दैवी निधन झाल्याने महाराष्ट्र राज्याचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे अशक्य आहे. अशा लोकाभिमुख नेत्याच्या स्मरणार्थ गोरगरिबांच्या घरातही ईदचा आनंद साजरा व्हावा या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला आहे. पुढील काळातही हा उपक्रम सातत्याने राबविण्याचा आमचा मानस आहे.या कार्यक्रमास जिल्हा सरचिटणीस राजकुमार पाटील, अब्रार शेख, बाळासाहेब कणसे व इतर मान्यवर उपस्थित होते.



मा.श्री झणझणे सर राजधानी कार्य गौरव पुरस्काराने सन्मानित

सातारा/डॉ जीवन मोहिते:

श्री समर्थ एज्युकेशन सोसायटी सोनवडी गजवडी.या संस्थेचे सचिव व कौशल्य विकास योजना महाराष्ट्र राज्य संघटनेचे अध्यक्ष आदरणीय श्री झणझणे सर यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल लोक साम्राज्य न्यूज- इंद्रधनु फौंडेशन राजधानी कार्य गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल आदरणीय श्री. झणझणे सर यांचे संस्था , संस्थेचे सर्व पदाधिकारी पाचही शाखेचे सर्व मुख्याध्यापक ,शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, सर्व आजी माजी विद्यार्थी व ग्रामस्थ तसेच विविध सामाजिक शैक्षणिक संघटना यांचे वतीने , हार्दिक अभिनंदना वर्षाव होत असून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत



जय श्रीराम च्या गजरात चाफळ सजलं; रामनवमी उत्सवाला भव्य सुरुवात

उंब्रज : (अमोल पवार)

गुढीपाडव्याच्या मंगल मुहूर्तावर चाफळ नगरीत भक्तीचा नाद घुमू लागला आहे. ऐतिहासिक श्रीराम मंदिरात सुरू झालेला रामनवमी उत्सव यंदाही पारंपरिक थाटात आणि उत्साहात रंगू लागला असून, संपूर्ण गाव "जय श्रीराम"च्या गजरात दुमदुमले आहे.समर्थ रामदास स्वामींच्या पवित्र स्मृतींनी नटलेल्या या भूमीत शेकडो वर्षांची परंपरा लाभलेला हा उत्सव यंदाही भाविकांच्या मोठ्या उत्साहात सुरू झाला आहे. मंदिर परिसरात आकर्षक सजावट, दैनंदिन पूजा-अर्चा, भजन-कीर्तन आणि धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळत आहे.उत्सव काळात दररोज दुपारी भजन आणि रात्री हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले असून, विविध गावांतील भजनी मंडळे आपल्या सुरेल सेवेद्वारे वातावरण अधिक भक्तिमय करत आहेत. कीर्तनकारांच्या ओजस्वी वाणीतून रामकथा रंगत आहे, तर भक्तगण तल्लीन होऊन या सोहळ्याचा आनंद घेत आहेत.२६ मार्च हा उत्सवाचा मुख्य दिवस असून, दुपारी १२.२० वाजता श्रीराम जन्मकाळ सोहळा पार पडणार आहे. त्यानंतर सुंवदा वाटप आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.तसेच, उत्सवादरम्यान नामवंत कीर्तनकार आणि कलाकारांची उपस्थिती लाभणार असून, त्यांच्या सादरीकरणामुळे कार्यक्रमांची शोभा आणखी वाढणार आहे.चाफळ नगरीत सध्या भक्ती, परंपरा आणि उत्साह यांचा सुंदर संगम पाहायला मिळत असून, या पवित्र सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.





वडवणीच्या कु.मनवा वाव्हळचे नवोदय परीक्षेत दैदिप्यमान यश

बीड

वडवणी,दि.१८(प्रतिनिधी):-

खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड येथील विद्यार्थिनी तसेच वडवणी येथील ज्येष्ठ पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांची नात व सहशिक्षक ज्ञानेश्वर सुभाषराव वाव्हळ यांची मुलगी कु.मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ हिने नुकत्याच जाहीर झालेल्या नवोदय विद्यालय प्रवेश पूर्व परीक्षेत दैदिप्यमान असे यश मिळवत संपूर्ण जिल्ह्यातून या परीक्षेत १७ व्या रँकनूसार व ९७ टक्के गुणांसह नवोदय विद्यालयातील आपल्या प्रवेशासाठी ती पात्र ठरली आहे. तिच्या या यशाबध्दल तिचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, शिक्षण क्षेत्रामध्ये अतिशय प्रतिष्ठित अशा समजल्या जाणाऱ्या व केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली असलेले बीड जिल्ह्यातील एकमेव असलेल्या नवोदय विद्यालय गढी या विद्यालयामध्ये इयत्ता सहावी प्रवेश पूर्व परीक्षा डिसेंबर २०२५ मध्ये संपन्न झाली होती. या परीक्षेचा निकाल मंगळवारी ऑनलाईन पध्दतीने जाहीर झाला. या परीक्षेत माजलगांव तालुक्यातील दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालय याठिकाणी इयत्ता पाचवी वर्गात शिक्षण घेत असलेली कु.मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ हिने आपल्या गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली कुशाग्र बुध्दीमत्तेच्या बळावर परीक्षेत दैदिप्यमान असे यश मिळवत संपूर्ण जिल्ह्यातून या परिक्षेत १७ व्या रँकनूसार व ९७ टक्के गुणांसह नवोदय विद्यालयातील आपल्या प्रवेशासाठी ती पात्र ठरली आहे. कु.मनवा ही वडवणी येथील दै.झुंजार नेताचे पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांची नात व सहशिक्षक ज्ञानेश्वर सुभाषराव वाव्हळ यांची मुलगी आहे. तिच्या या यशामागे तिचे कुटुंबीय पालक तसेच आजवर तिला प्रत्येक ठिकाणी उत्कृष्ट मार्गदर्शक म्हणून लाभलेले किर्ती बाल शिक्षण केंद्र, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामबाग वडवणी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोन्नाखोटा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोटानाईक तांडा, राजमाता मार्गदर्शन केंद्र वडवणी, व खोलेश्वर विद्यालय दिंद्रूड येथील तिचे सर्व गुरुजन वर्ग यांचे परिश्रम आहेत. या यशाचे सर्व श्रेय त्यांनाच जाते. तिच्या यशाबध्दल तिचे शाळेतील सर्व गुरुजन वर्ग तसेच वडवणी व तालुक्यातील पत्रकारिता, शिक्षण क्षेत्रासह सर्वच क्षेत्रातील त्यांचे स्नेहीजन यांनी कु.मनवा हिचे अभिनंदन करुन तिला तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.



कृष्णा नदीपात्रात चिमुकल्याचा मृतदेह; ओळख पटविण्याचे आवाहन

उंब्रज : अमोल पवार

वडोली भिकेश्वर गावच्या हद्दीत कृष्णा नदीपात्रात अंदाजे ७ ते ८ वर्षे वयाच्या मुलाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना समोर येताच स्थानिक नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, नदीपात्रात हा मृतदेह आढळून आला असून संबंधित मुलाची ओळख अद्याप पटलेली नाही. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.सदर मुलाची ओळख पटविण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू असून, कोणाला या मुलाबाबत माहिती असल्यास तात्काळ मसुर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, नेमकी घटना कशी घडली याबाबत पोलीस अधिक तपास करत आहेत.

महिला दिन वर्षभरच साजरा केला पाहिजे : धनश्री महाडिक

सातारा : आठ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन असतो.म्हणून त्याच दिवशी महिलांचा सन्मान झाला पाहिजे.असे काहीही नाही.तर तो काही ठिकाणी नंतर घेतात. मात्र,सर्वसामान्यांसाठी अहोरात्र झटणाऱ्या महिलांचा सन्मान हा ३६५ दिवस झाला पाहिजे.असे परखड विचार काँग्रेसच्या प्रदेश प्रवक्त्या धनश्री महाडीक यांनी व्यक्त केले. येथील काँग्रेस भवनमध्ये महिला दिनानिमित्त राष्ट्रीय शिक्षण विभाग व वैद्यकीय मदत सेल यांच्यामार्फत क्रांतीसेना नाना पाटील सहकार्यरुग्णालय व नगरपालिका येथील महिला सफाई कामगार यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.तेव्हा महाडीक मार्गदर्शन करीत होत्या.अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्षा सुषमा राजे घोरपडे होत्या. सामाजिक कार्यकर्ते अनिल वीर म्हणाले,"स्वातंत्र्य काळापासून काँग्रेसला मिळालेला वारसा आहे.त्यांनी तळागाळात कार्य करणाऱ्या महिलांना प्रोत्साहन देऊन सन्मान करीत आहे.स्वच्छतादूत म्हणून महिला आपापल्या घरापासून नोकरीपर्यंत स्वाभिमानाने काम करीत आहेत.पुरुषांच्या दोन पावले पुढे त्या जबाबदारीने कार्यरत असतात.कोणतेही काम छोटे असूच शकत नाही.सीमारेषेवर लढणाऱ्या सैनिकांचा आपणास अभिमानच आहे.मात्र,जे काही छोटे-मोठे काम तुम्ही-आम्ही करीत असाल तर तेही समाजाबरोबरच राष्ट्रासाठी प्रेरणादायी असते.राष्ट्रात राजकीय चढउतार होत आहे.त्यास बहुजन समाजच जबाबदार आहे.कारण,तो संघटीत होत नाही.प्रत्येकाची चूल वेगवेगळी आहे." बहुजन समाज सर्वत्र विखुरला असल्याने राजकीय नुकसान होत आहे.तेव्हा दगडापेक्षा वीट मऊ म्हणून समविचारी पक्षाबरोबर जाणे केव्हाही चांगले आहे.असा पुरुच्चाही वीर यांनी केला.वैद्यकीय शहर विभागीय अध्यक्षा माधवी वरपे म्हणाल्या,"डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांनाच न्याय दिला आहे.तेव्हा सावित्री,रमाई,जिजाऊ,अहिल्यादेवी,भिमाई आदींच्या लेकी म्हणून महिलांचा सन्मान होणे गरजेचे आहे."



अध्यक्षस्थानावरून बोलताना राजे घोरपडे म्हणाल्या,"भाजप हा धनधांडग्याचा विचार करीत असल्याने सर्वत्र असमानता आढळुन येत आहे.याउलट कांग्रेसचे काम असल्याने चतुर्थश्रेणीतील कर्मचारी महिलांचा सन्मान झाला आहे.तेव्हा कष्टकरी महिलांनी कामावर निष्ठा ठेवुन आनंदी जीवन जगले पाहिजे.समविचारी व बहुजन यांना सोबत घेऊन काम करीत आहे.कोणत्याही प्रकारची अडचण असली तरी त्याचे निराकरण व न्याय देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. दर बुधवारी सकाळी ११ ते दुपारी ३ यावेळेत जनता दरबार भवनमध्ये भरत असतो. कायदेशीर बाबींची पूर्तता करूनच आम्ही सज्ज असतो."कायदेशीर बाबीसाठी खास वकिलाची नेमणूक करून कार्यशाळेचेही आयोजन करण्यात येणार आहे.तसेच प्रत्येक आठवड्यास होणाऱ्या जनता दरबाराचाही लाभ घ्यावा. असेही आवाहन त्यांनी केले. प्रथमतः रणरागिणी महिलांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले.यावेळी उज्वला महादेव कांबळे,लक्ष्मी पांडुरंग गुजर,आर अशोक कदम, गीता प्रदीप लाड, संजीवनी महादेव घाटे, अर्चना तानाजी वाघमारे, माया विजय कांबळे,सोनिया धीरज लाड आदींचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.जिल्हा वैद्यकीय मदत विभागीय अध्यक्ष आफसाना बागवान यांनी स्वागत केले. पश्चिम महाराष्ट्र विद्यार्थी पालक संघटनेचे सरचिटणीस श्रीकांत कांबळे यांनी प्रास्ताविक केले. सौ.सुवर्णा व श्री.एन.जी.कारंडे (अध्यक्ष,जिल्हा शिक्षक संघटना) या दाम्पत्यानी सूत्रसंचालन केले.सादिकभाई यांनी आभार मानले.सदरच्या कार्यक्रमास ओ.बी.सी.संघटनेचे जिल्हाध्यक्ष भरत लोकरे,ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दत्ता राऊत,अंनिसचे प्रकाश खटावकर,प्रा.रमेश म्हस्के,वक्ते आबा तथा सुरेश मुळीक, ऍड.प्रा. विलास वहागावकर, विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी,कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य अध्यक्षपदी प्राचार्या प्रमोदिनी मंडपे यांची निवड

विटे, (प्रतिनिधी) :
सातारा येथील कास पठार येथे झालेल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य कार्यकारणी बैठकीमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या जेष्ठ कार्यकर्त्या प्राचार्या प्रमोदिनी सुकुमार मंडपे (सातारा) यांची संघटनेच्या राज्य अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. प्राचार्या मंडपे या डॉ.नरेंद्र दाभोलकरांच्या सोबत संघटनेच्या स्थापनेपासून ४० वर्षे अंनिसचे कार्य करत आहेत. तसेच त्या रयत शिक्षण संस्थेच्या डीएड कॉलेजच्या प्राचार्या होत्या. त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलनावर अनेक पुस्तके लिहिली आहेत.शिवाय, व्याख्याने व प्रशिक्षणे दिली आहेत.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या मार्गदर्शक म्हणून सरोजमाई पाटील यांचीही निवड सर्वांनी एकमताने केली. महाराष्ट्र अंनिस 2026 ते 2029 या तीन वर्षांची राज्य कार्यकारणी पुढीलप्रमाणे आहे. बुवाबाजी संघर्ष विभाग- कार्यवाह : नंदिनी जाधव (पुणे),सहकार्यवाह : कमलाकर जमदाडे (बिलोली नांदेड), प्रा.परदेशी जगदीश (छत्रपती संभाजी नगर), भगवान रणदिवे (सातारा) व शंकर बोर्डे (जालना). सोशल मीडिया विभाग-कार्यवाह : वाघेश साळुंखे (विटा सांगली), सहकार्यवाह : सई सावंत (मुंबई), गौरव सर्जेराव (मुंबई), राहुल माने (पुणे) व ज्ञानेश्वर गिराम (जालना).सांस्कृतिक विभाग : कार्यवाह : डॉ.अस्मिता बालगावकर (सोलापूर), सहकार्यवाह : सीमा पाटील (कोल्हापूर),शिवाजी कांबळे (नांदेड), देवानंद बडगे (नागपूर)



व विनोद वायंगणकर(रत्नागिरी).जात निर्मूलन व जोडीदाराची विवेकी निवड विभाग-कार्यवाह : शंकर कणसे (सातारा), सहकार्यवाह : निशा भोसले (सोलापूर), बाळकृष्ण भापकर (पुणे) व अनिलबगोंडाने (गोंदिया). वार्तापत्र व प्रकाशन संपादक मंडळ-राजीव देशपांडे (नवी मुंबई),मुक्ता दाभोलकर (मुंबई),अनिल चव्हाण (कोल्हापूर) व राहुल थोरात (सांगली). प्रकाशन विभाग-कार्यवाह : प्रभाकर नानावटी (बेळगाव) व सहकार्यवाह : श्रीपाल ललवाणी (पुणे).वैज्ञानिक जाणीवा प्रकल्प अंतर्गत डॉ. नरेंद्र दाभोलकर लोकविद्यापीठ राज्य कार्यवाह : रमेश माने (लातूर), सहकार्यवाह : सुजाता म्हेत्रे , (तासगाव सांगली), मधुकर गायकवाड (जालना), सुभाष सोळंखी(पुणे) व जोतिबा आगसिमनी (बेळगाव). महिला विभाग-कार्यवाह : उषा शहा (सोलापूर),सहकार्यवाह : देवयानी भगत (नागपूर),गीता हसुरकर (कोल्हापूर) व किरण जाधव (अंबरनाथ,ठाणे)विविध उपक्रम विभाग- कार्यवाह : प्रा. प्रवीण/देशमुख (ठाणे),सहकार्यवाह : फारुख गवंडी (सांगली),संजय निटवे (सांगली),संदेश घोलप (पालघर).संदेश गायकवाड, (रायगड), रामभाऊ नलावडे, (पुणे),शारदा खोब्रागडे (चंद्रपूर), विजय सुर्वे (पुणे),व प्रा.ज्ञानेश्वर डाकोरे (नांदेड). युवा विभाग : कार्यवाह : बाळू माळी (कोल्हापूर),सह कार्यवाह : मुंजाजी कांबळे (परभणी), प्रथमेश कुरणे (मुंबई),राजू जाधव (पुणे) व विनायक माळी (मंगळवेढा, सोलापूर).मानसिक आरोग्य विभाग- कार्यवाह : वंदना माने (सातारा),सहकार्यवाह : विजया श्रीखंडे (नागपूर),उदय चव्हाण (सातारा),नरेंद्र कांबळे (वर्धा), डॉ. अमोल पवार (पलूस सांगली) व ॲड. साधना बाजारे (चाकण पुणे).संघटना बांधणी- कार्यवाह : डॉ. हमीद दाभोलकर (सातारा), सहकार्यवाह : रामभाऊ डोंगरे , प्रकाश घादगिने (लातूर), मिलिंद देशमुख (पुणे),अनिश पटवर्धन (दापोली) व डॉ.शाम महाजन (छत्रपती संभाजीनगर). प्रशिक्षण विभाग-कार्यवाह:सम्राट हटकर (नांदेड),सह कार्यवाह : अण्णा कडलासकर (पालघर), वंदना शिंदे (ठाणे), प्राचार्य राजेंद्र कांकरिया (पिंपरी चिंचवड,पुणे) व नीता सामंत (चाळीसगाव). विवेक वाहिनी- कार्यवाह : डॉ.अशोक कदम (बार्शी), सहकार्यवाह : प्रा. एस. के. माने (ईश्वरपूर, सांगली), प्रा.नवनाथ अडकीने (नांदेड) व प्रा.जगदीश आवटे (वाघोली, पुणे).कायदा विभाग - कार्यवाह : ॲड. दीपक भाते (पालघर), सहकार्यवाह : ॲड. विजयकुमार बर्गे (बारामती, पुणे.) व ॲड. पुजा जाधव (वर्धा). या सोबत वरील सदस्यांमधून 20 जणांच्या राज्य कार्यकारी समितीचीही निवड करण्यात आली आहे.सदरच्या बैठकीसाठी 23 जिल्ह्यातील 121 तालुक्यातून तीनशेहून अधिकचे कार्यकर्ते उपस्थित होते.या दोन दिवसीय बैठकीचे संयोजन सातारा जिल्हा शाखेने अतिशय नेटके केले होते.

घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा तात्काळ सुरळीत करा

शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक - मुकुंद सिनगर

राहता प्रतिनिधी – ज्ञानेश्वर साबळे,
उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाच्या प्रमुख पदाधिकारी यांनी आज नुकतेच अप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांची कार्यालयात भेट घेऊन जिल्ह्यातील घरगुती गॅस सिलेंडरचा कृत्रिमपणे निर्माण झालेला तुटवडा तात्काळ दूर करण्याची मागणी केली, याची गंभीर दखल घेऊन माननीय जिल्हाधिकारी महोदयानी तात्काळ माननीय जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कडून माहिती मागवली आणि काळाबाजार रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्यात.शिवसेना नेते तथा अध्यक्ष खा.अनिल भाऊ देसाई आणि सरचिटणीस विजय मालणकर यांच्या सुचनेवरून शिर्डी येथील शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात कांही ग्राहकांच्या लेखी तक्रारी आल्याने त्याची दखल घेत सर्व पदाधिकारी यांनी माननीय जिल्हाधिकारी



यांची तात्काळ भेट घेऊन सविस्तर माहिती दिली. यावेळी शिवसेनेचे जिल्हा समन्वयक तथा ग्राहक संरक्षण कक्षाचे प्रांतिक सदस्य मुकुंद सिनगर यांनी अधिक सांगितले की, एका बाजूला राज्यकर्ते सांगतात की भारत देशाची जागतिक महासत्तेकडे वाटचाल सुरु आहे आणि वास्तविकतेत आपण साधा जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा वेळेवर करू शकत नाही, हे भीषण सत्य आहे. यातच शासनाने घालून दिलेल्या नियमांची पायमल्ली होत असून आपल्या जिल्ह्यातील गॅस वितरणामध्ये मोठा काळाबाजार सुरु असल्याचे आमच्याकडे आलेल्या तक्रारीतून स्पष्ट जाणवते आहे. अनेक गॅस एजन्सी कृत्रीम तुटवडा भासवून ऑनलाईन बुकिंग बंद करणे, बुकिंग नसेल तर वाढीव पैसे आकारणे, घरगुती गॅस वाढीव दराने व्यावसायिकांना देणे असे प्रकार सुरु आहेत, ही अत्यंत गंभीर बाब आहे. यापुढे असे प्रकार निदर्शनास आल्यास तात्काळ आमच्या जवळच्या कार्यालयात अथवा संबंधित शाखा संघटक यांच्याशी संपर्क साधून लेखी तक्रार देणेबाबत आवाहन करत सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी शिवसेना सतत पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही दिली. यानंतर कार्यालयप्रमुख ॲड.राहुल नवले यांनी शासनाच्या परिपत्रकाची माहिती देत कायदेशीर मार्गाने प्रत्येक ग्राहकाला न्याय मागण्याचा अधिकार असून चुकीचा प्रकार दिसल्यास तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन केले. यावेळी शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे राज्य कार्यकारिणी सदस्य मुकुंद सिनगर, जिल्हा कार्यालयप्रमुख ॲड.राहुल नवले, शेतकरी सेनेचे तालुकाप्रमुख धर्मा जावळे, तालुका संघटक रिंकेश जाधव, उपतालुका संघटक श्रीराम कदम, कक्ष शहर संघटक रवि सोनवणे, कक्ष उपशहर संघटक हृषीकेश भोळे आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

धनिणीची बाग ही लक्ष्मीबाईमुळे ज्ञानतीर्थ ठरली : प्राचार्य यशवंत पाटणे

सातारा (अनिल वीर यांजकडून) :
ज्या प्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दीक्षाभूमी निर्माण केली.त्याच धर्तीवर रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांनी सातारच्या धनिणीची बाग ही शिक्षणासाठी सेवातीर्थ ठरली. खरोखच, त्यांच्या त्यागातून ज्ञानतीर्थ ठरली आहे.असे प्रतिपादन प्राचार्य यशवंत पाटणे यांनी केले. येथील धनिणीच्या बागेत रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचा ९६ वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला.तेव्हा प्राचार्य पाटणे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संघटक डॉ.अनिल पाटील होते. प्राचार्य यशवंत पाटणे म्हणाले, "पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी हट्ट करणारी माता रमाईला बाबासाहेबांनी



सांगितले,दर्शनासाठी प्रवेश मिळणार नाही.तेव्हा आपण नव्याने तीर्थ स्थळ निर्माण करू.पुढे त्यांनी नागपूर येथे दिक्षाभूमी निर्माण केली.रमाई सावली बनली होती.त्याच धर्तीवर लक्ष्मीबाईनी स्वत:चे ५ वेळा दागिने व २ वेळेस मंगळसूत्र देऊन रयत संस्थेस मदत करून रयत माऊली झाली.गुढी पाडव्याला बोर्डिंगमधील मुलांसाठी गोडधोड मिळावे म्हणून माउलींनी पूर्व संध्येला दागिने घाण ठेवले होते.त्यांनी कर्मवीर भाऊराव यांच्याबरोबर ज्ञानदान देण्यासाठी साह्य केले."त्यांचा कार्यकाळ या बागेतच गेल्याने आपल्या सर्वांचे तीर्थक्षेत्र ठरले आहे.असाही त्यांनी पुनरुच्चार केला. यावेळी अध्यक्षस्थानावरून संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील यांनी कर्मवीर व माऊली यांच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगितले. वस्तीगृहाचे अधीक्षक प्रशांत गुजरे यांनी आढावा घेतला. माजी जिल्हाधिकारी विकास देशमुख यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य शिवलिंग मेनकुदळे यांनी आभार मानले.सदरच्या कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, रयत सेवक व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वडवणी वैकुंठधाम याठिकाणी अस्थी ठेवण्यासाठीच्या लॉकरचे लोकार्पण

रामलिंग पतसंस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त अभिनव उपक्रम

बीड
वडवणी,दि.१८(प्रतिनिधी):-
मानवी जिवनातील शेवटच्या टप्प्यावर देखील सन्मान आणि सुव्यवस्था मिळावी, या उदात्त भावनेतून वडवणीच्या रामलिंग पतसंस्थेने आपल्या वर्धापन दिनानिमित्त येथील वैकुंठधाम (अमरधाम) याठिकाणी अस्थी ठेवण्यासाठीचे लॉकर भेट देवून सुविधेसाठी उपलब्ध करण्याचा हा अतिशय स्तुत्य व अभिनव असा सामाजिक उपक्रम राबवला आहे. अशा प्रकारच्या सुविधेमुळे मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना व नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, समाजहिताच्या दृष्टीने हे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप यांनी लोकार्पणाप्रसंगी व्यक्त केले.
याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था म.ता.वडवणी या पतसंस्थेने बीड जिल्ह्याच्या नव्हे तर मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात आपल्या पारदर्शक, तत्पर व विनम्र सेवेतून हजारो ग्राहकांचा विश्वास संपादन करीत सहकाराचे मोठे जाळे विणले आहे. आजवर अनेक अभिनव व सामाजिक उपक्रमांतून पतसंस्थेने आपली वेगळेपणाची चुणूक नेहमीच दाखवली आहे. यावर्षीही आपल्या पतसंस्थेच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त जनहिताचाच उपक्रम राबविण्याचा निर्णय सर्वश्री संचालक मंडळ व सभासद बांधवांनी घेतला होता. त्यानूसार वडवणी शहरातील वैकुंठधाम (अमरधाम) याठिकाणी मृत व्यक्तीच्या अस्थी सावडण्याचा विधी झाल्यानंतर वैकुंठधाम याठिकाणीच एका छोट्या मातीच्या कलशामध्ये पांढरे कापड गुंडाळून काही प्रमाणात अस्थी व राख पुढील सात दिवसांसाठी ठेवावी लागते. कारण दहावा विधीसाठी त्या अस्थी व राख तेथून सोबत घेवून जावी लागते. मात्र त्याठिकाणी तो मातीचा कलश ठेवण्यासाठी सुरक्षित जागा व ठिकाण उपलब्ध नसल्याने नाईलाजाने नागरिकांना तो अस्थी कलश तेथील एखाद्या झाडाखाली फांदीला बांधून ठेवावा लागत असे. अनेकदा तर अस्थी कलशाची आदला-बदलीही झाल्याच्या घटना ऐकवयास आहेत. त्याठिकाणी नागरिकांची हीच होणारी हेळसांड लक्षात घेवून रामलिंग पतसंस्थेच्या संचालक मंडळ यांनी वैकुंठधाम याठिकाणी अस्थी कलश सुरक्षित ठेवण्यासाठी एक २४ कप्प्यांचे कुलूपबंद लोखंडी लॉकर कपाट भेट देण्याचा निर्णय घेतला. व त्यानुसार नेहमीप्रमाणे सामाजिक बांधिलकी जपणारा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. दि.१८ मार्च २०२६ बुधवार रोजी सकाळी या अस्थी ठेवण्यासाठीचे लॉकरचे लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी नगरपंचायतीचे नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, सभापती नागेश डिगे, नगरसेवक संभाजीराव शिंदे, नगरसेवक श्रीकांत माळवदे, सुरेशराव दिवटे, रामेश्वर पाटोळे, रामलिंगचे व्हाईस चेअरमन अरुणराव गुरसाळी, व्यवस्थापक दिगांबर गुरसाळी, सर्वश्री संचालक सुरेशराव ढवळशंक, प्रकाशराव डिगे, उपमन्यूजी वारे, पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांच्यासह कर्मचारी वृंद व नागरिक उपस्थित होते. संचालक व सभासद बांधवांनी या लॉकरच्या चाव्या नगराध्यक्ष यांच्याकडे सुपूर्द करत या अत्यंत उपयुक्त व संवेदनशील सुविधेचे लोकार्पण मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. दरम्यान यावेळी उपस्थितांनी वैकुंठधाम याठिकाणी अंत्ययात्रेसाठी आवश्यक असणारी तिरडी ही वस्तू देखील पतसंस्थेच्या वतीने देण्यात यावी अशी भावना वजा मागणी केली असता, याठिकाणी लागलीच स्टीलच्या दोन तिरडी पतसंस्थेच्या वतीने देण्यात येतील असे व्हाईस चेअरमन अरुणराव गुरसाळी यांनी सांगितले. तत्पूर्वी सकाळी या अगोदर रामलिंग पतसंस्थेच्या सभागृहात या वर्धापन दिनानिमित्त श्री.चौंडेश्वरी मातेच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले होते. याप्रसंगी अनेक संचालक, सभासद, ग्राहक व कर्मचारी वृंद उपस्थित होते.



मोर्वे सोसायटीच्या चेअरमन पदी सौ मंगल तानाजी धायगुडे पाटील यांची निवड

खंडाळा प्रतिनिधी (गणेश गुरव)
मोर्वे येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी सौ.मंगल तानाजी धायगुडे पाटील यांची निवड झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.त्यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.सौ.मंगल धायगुडे यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी तसेच सभासदांच्या हितासाठी प्रभावी कामकाज



करावे,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.निवडणूक अधिकारी म्हणून तायडे साहेब यांनी काम पाहिले तर सचिव सुप्रिया मोहिते आणि सोसायटी कर्मचारी रुपाली धायगुडे यांनी त्यांना सहकार्य केले. या निवडीवेळी उपस्थित सोसायटी संचालक मल्हारी अण्णा जगताप, ज्ञानेश्वर धायगुडे, आप्पासाहेब धायगुडे, अविनाश धायगुडे, सिताराम धायगुडे, गोपाळ धायगुडे, राजेंद्र जाधव, विनोद जाधव, संतोष जगताप, अंकुश पडळकर, बाळासो जगताप यांच्यासह मोर्वे ग्रामस्थ अशोक धायगुडे, राहुल धायगुडे, गोविंद धायगुडे, तुकाराम धायगुडे, भीमराव धायगुडे, पुरुषोत्तम धायगुडे, पंडित धायगुडे, माऊली जगताप, कमलाकर पडळकर, महेश जाधव, घनश्याम धायगुडे, प्रशांत धायगुडे, विशाल धायगुडे,ताराबाई धायगुडे उपस्थित होते.

पुणे जि. प. चे नवनिर्वाचित उपाध्यक्ष विवेक दादा वळसे पाटील यांचा सत्कार

कैलास गायकवाड लोणी प्रतिनिधी
पुणे जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष विवेक दादा वळसे पाटील यांचा सत्कार पत्रकार व कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आला. दुसऱ्यांदा उपाध्यक्षपदी निवड झालेले विवेक प्रतापराव वळसे पाटील



हे म्हणजे अभ्यासुवृत्ती, संघटन कौशल्य, प्रशासकीय अनुभव, लोक संघटन असा दांडगा अनुभव असलेले हे व्यक्तिमत्व यांच्या निवडीने आंबेगाव तालुक्यात आनंदाचे वातावरण असून त्यांचा प्रथम सत्कार पत्रकारांच्या वतीने करण्यात आला, यावेळेस पत्रकार प्रताप हिंगे पाटील, पत्रकार कैलास गायकवाड, पत्रकार डॉ. सुदाम बिडकर व त्यांचे कुटुंबीय, आंबेगाव तालुका खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष अनिल शेठ वाळुंज, प्रसिद्ध निवेदक निलेश पडवळ, राष्ट्रवादी (अजित पवार) गटाचे रामदास जाधव (सरचिटणीस) व इतर मान्यवर हजर होते.

तायवाडे कॉलेज राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित"राज्यस्तरीय करिअर कट्टा प्रोत्साहन स्पर्धेत उत्तुंग भरारी

कोराडी (दिलीप येवले):- महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत राज्यस्तरीय स्पर्धा 2026 पुरस्कार वितरण सोहळा 25 फेब्रुवारी रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथे पार पडला या पुरस्कार वितरण सोहळ्याला याहीवर्षी तायवाडे,कॉलेज महादुला – कोराडी यांनी 13 पुरस्काराचे मानकरी होऊन पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध केलेली आहे. विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी तसेच ज्ञानवृद्धीसाठी उपयोजित विषयाचे विविध उपक्रम राबविले जातात. महाराष्ट्रातील महाविद्यालयात हे उपक्रम राबविले जात असताना ग्रामीण भागातील तायवाडे कॉलेजने प्रस्तुत उपक्रम अतिशय शिस्तशीरपणे, नियमितपणे, यथायोग्य पद्धतीने राबवून विद्यार्थ्यांना एक विवक्षित दिशा देण्याचे कार्य केलेले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने झटणारे महाविद्यालय म्हणून महाविद्यालयाचा लौकिक आहे. यावर्षी करिअर कट्टा अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे तायवाडे कॉलेज महादुला कोराडीला राज्यस्तरीय द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याचवेळी राज्यस्तरीय उत्कृष्ट महाविद्यालय द्वितीय पुरस्कार प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येऊन गौरवान्वीत करण्यात आले. या समारंभात राज्यस्तरीय उत्कृष्ट विभागीय प्राचार्य प्रवर्तक हा पुरस्कार तायवाडे कॉलेज, महादुला – कोराडी येथील प्राचार्य डॉ.शरयू तायवाडे यांना प्रदान करण्यात आला.





तद्वतच राज्यस्तरीय उत्कृष्ट सह विभागीय समन्वयक पुरस्कार डॉ.वर्षा वैद्य यांना प्राप्त झाला. प्रस्तुत पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री मा. नामदार श्री . उदयजी सामंत यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आले.याप्रसंगीमाननीय रवींद्र साठे सभापती तसेच राज्यमंत्री दर्जा महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ मुंबई महाराष्ट्र शासन तसेच माननीय डॉ. नामदेव भोसले सहसचिव मराठी भाषा विभाग महाराष्ट्र शासन माननीय श्री प्रफुल्ल पाठक अध्यक्ष सोलर एनर्जी सोसायटी ऑफ इंडिया ऑडीओलॉजिस्ट व्हाइस थेरपीस्ट , सोनाली लोहार माननीय मिथिला दळवी संस्थापिका संवाद ए डायलॉग माननीय डिंपल मित्तल तज्ञ मार्गदर्शक आर्थिक साक्षरता यांचेही उपस्थिती होती .नागपूर विभागीय पुरस्कार वितरण सोहळा कमला नेहरू महाविद्यालय नागपूर येथे माननीय अमित भोळे संचालक महसूल विभाग, अर्थ मंत्रालय, भारत सरकार यांच्या प्रमुख उपस्थितीत माननीय अभिजीतदादा वंजारी ,आमदार, महाराष्ट्र विधान परिषद यांच्या अध्यक्षतेखाली माननीय यशवंत शितोळे , डॉ. स्मिता वंजारी, प्राचार्य प्रवर्तक डॉ. सुजित मेत्रे व डॉ. दिलीप बडवाईक यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. याप्रसंगी नागपूर विभागीय उत्कृष्ट महाविद्यालय प्रथम पुरस्कार तायवाडे कॉलेजला प्राप्त झाला. तसेच उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय ग्रामीण प्रथम पुरस्कार हा तायवाडे कॉलेज महादुला-कोराडी यांना प्राप्त झाला तर उत्कृष्ट महाविद्यालय समन्वयक प्रथम पुरस्कार तायवाडे कॉलेज महादुला – कोराडी येथील भौतिकशास्त्र विभागातील प्रा. डॉ.कमलेश डाबरे यांना प्राप्त झालेला आहे. उत्कृष्ट संसद प्रथम पुरस्कार ग्रामीण आणि नव्वद दिवस ऍक्टिव्हिटी केलेले पदाधिकारी प्रतीक गहूकर आणि दीप्ती भड यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले रील स्पर्धेमध्ये द्वितीय पुरस्कार कुमारी अंजली बिसेन तर तृतीय पुरस्कार निखिल विरुळकर यांना प्रदान करण्यात आला तसेच मराठवाडा पूर्ण निधी संकलन विशेष कार्यासाठी प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले राज्यस्तरीय व विभागीय अशा एकूण संपूर्ण वर्षभरातील ऍक्टिव्हिटी साठी एकंदरीत 13 पुरस्काने तायवाडे कॉलेज सन्मानित झाल्यामुळे श्री सच्चिदानंद शिक्षण संस्थेच्या संपूर्ण परिवारामध्ये याबद्दल विशेष आनंद व्यक्त करण्यात येत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2026 च्या नवीन पद्धतीनुसार व्यवसायाधीष्टीत कौशल्याधारित अभ्यासक्रम विशेषत्वाने राबविण्याचे प्रयत्न सार्वत्रिक सुरू असताना तायवाडे कॉलेजला प्रस्तुत उपक्रम राबविल्याबद्दल प्राप्त झालेले करिअर कट्टाचे पुरस्कार ही नव्या धोरणाला उत्तेजन देणारी महत्त्वपूर्ण बाब आहे.हे येथे लक्षात घेणे गरजेचे आहे . तायवाडे कॉलेजला सातत्याने मिळणाऱ्या यशाबद्दल श्री सच्चिदानंद शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे आणि संस्थेतील सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष अभिनंदन केलेले आहे.

नवोदय प्रवेश परीक्षेत किन्हाळा शाळेचा दणदणीत यश

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे. समुद्रपूर : जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, किन्हाळा येथील विद्यार्थ्यांनी नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा व गावाचा गौरव वाढवला आहे. या परीक्षेत शाळेतील यश अशोक बावणे व ओम उत्तम बावणे या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.या यशामागे मार्गदर्शक शिक्षक श्री. बोधाने सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच मुख्याध्यापिका सौ. वंदना भोयर व स. अ. डांगरे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना योग्य दिशा देत विशेष परिश्रम घेतले.या उल्लेखनीय यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ तसेच गावातील सर्व प्रतिष्ठित व्यक्तींनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व शाळेचे



मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. यासोबतच गटशिक्षणाधिकारी गिद्देवार व विस्तार अधिकारी श्री. घोडे, कावळे, बारसागडे तसेच केंद्रप्रमुख सिडाम यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करत अभिनंदन केले.विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असून शाळेची शैक्षणिक गुणवत्ता अधोरेखित झाली आहे. भविष्यातही असेच यश संपादन करण्यासाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

करिअर कट्टा पुरस्कार नागपूर विभागीय सोहळ्यात रामकृष्ण वाघ महाविद्यालयाला बहारदार सुयश

कोराडी (दिलीप येवले) : – महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व कमला नेहरू महाविद्यालय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी विभागीय पुरस्कार वितरण सोहळा "विकसित भारत 2047 महाराष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व उच्च शिक्षणाची भूमिका "या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा सन 2026 चे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्ष मा. अँड. अभिजीत वंजारी (आमदार, महाराष्ट्र विधान परिषद), प्रमुख पाहुणे अमित भोळे (संचालक, महसूल विभाग, अर्थ मंत्रालय, भारत सरकार), यशवंत शितोळे (अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र) डॉ. स्मिता वंजारी (कोषाध्यक्ष, अमर सेवा मंडळ सिनेट सदस्या, रा.तू.म. नागपूर विद्यापीठ), डॉ. शरयू तायवाडे (विभागीय प्राचार्य प्रवर्तक, नागपूर विभाग), डॉ. दिलीप बडवाईक (प्राचार्य ,कमला नेहरू, महाविद्यालय नागपूर), मा. डॉ. सुजित मेत्रे (प्राचार्य प्रवर्तक नागपूर जिल्हा) उपस्थित होते. या प्रसंगी आमच्या महाविद्यालयाला उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय (ग्रामीण) तृतीय क्रमांक, उत्कृष्ट महाविद्यालयीन समन्वयक (ग्रामीण) प्रा. सायली पिदळी द्वितीय क्रमांक, राज्यस्तरीय प्रकाशन संपादकीय समितीमध्ये विशेष कामगिरीबद्दल पुरस्कार रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथील प्रा. सायली पिदळी यांना मिळाला. जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार A W S Career Tour. विभागीय द्वितीय क्रमांक A W S Career Tour, सोलर एनर्जी अवेअरनेस 2025 प्रशिक्षण अभियान रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक, डिझास्टर रिलीफ फंड प्रमाणपत्र, 90 दिवसाच्या विशेष उपक्रमामध्ये सातत्यपूर्ण सहभागी यासाठी करिअर संसद पदाधिकारी यांना पुरस्कार रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स देण्यात आला. यासाठी संस्थेचे संचालक डॉ. मारोती वाघ, संचालिका लता वाघ, प्रभारी प्राचार्य पंकज झगडे यांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन लाभले आणि योग्य कामगिरीबद्दल अभिनंदन केले. कार्यक्रमाला सर्व शाखा विभाग प्रमुख प्रा. दीपक ठाकरे उपस्थित होते. करिअर कट्टा नागपूर जिल्हा नियोजन समितीची आमच्या महाविद्यालयाची सदस्य म्हणून सानिया कान्हारकर उपस्थित होती. करिअर कट्टा समन्वयक प्रा. सायली लाखे पिदळी, प्रा. किरण पांडे यांनी महाविद्यालयातील संस्थापक वाघ सर संचालिका वाघ, सहकार्य लाभलेल्या प्रत्येकांविषयी आणि करिअर संसदेविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे.



शांततेच्या शोधात सातासमुद्रापारचा तरुण कामठीत!

अमेरिकेतील युद्धजन्य वातावरणातून विरक्ती; ड्रॅगन पॅलेसमध्ये १० दिवसांची खडतर विपश्यना

कामठी (दिलीप येवले) : रशिया-युक्रेन, अफगाणिस्थान - पाकिस्तान आणि इस्त्रायल-अमेरिका - इराण अशा युद्धांच्या दाहकतेने संपूर्ण जग होरपळून निघत असताना, आधुनिक जगातील तणावापासून दूर राहून मनाची शांती मिळवण्यासाठी सातासमुद्रापारचा एक विद्यार्थी चक्क कामठीत दाखल झाला आहे. अमेरिकेतील 'युनिव्हर्सिटी ऑफ वॉशिंग्टन'चा रॉन वेरेड या २४ वर्षीय विद्यार्थ्याने कामठी येथील जगप्रसिद्ध ड्रॅगन पॅलेस टेम्पल परिसरातील 'ड्रॅगन पॅलेस विपश्यना मेडिटेशन सेंटर' मध्ये १० दिवसांचे निवासी शिबीर यशस्वीरित्या पूर्ण केले.

युद्धाच्या तणावातून 'धम्म' मार्गाकडे

सध्या जागतिक स्तरावर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे तरुणाईच्या मानसिकतेवर मोठा परिणाम होत आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशात राहूनही, वैचारिक गोंधळ आणि मानसिक अस्वास्थ्यावर उपाय म्हणून रॉन याने भारतीय प्राचीन 'विपश्यना' पद्धतीची निवड केली. ६ मार्च ते १७ मार्च २०२६ या कालावधीत त्याने ड्रॅगन पॅलेस येथील केंद्रात 'निवासी शिबीर' पूर्ण केले.

मेडिकलचा विद्यार्थी, पण ध्यानाची ओढ



रॉन हा पेशाने 'एमडी' (वैद्यकीय) शिक्षण घेणारा विद्यार्थी आहे. विज्ञानाची कास धरतानाच मनाचे विज्ञान समजून घेण्यासाठी त्याने ड्रॅगन पॅलेस गाठले. विशेष म्हणजे, या १० दिवसांच्या शिबिरात त्याने कडक शिस्त पाळत मौन धारण केले होते. या शिबिरामुळे त्याला जीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन मिळाल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

कामठीचे नाव जागतिक नकाशावर

ड्रॅगन पॅलेस येथील विपश्यना केंद्र हे केवळ विदर्भासाठीच नव्हे, तर जगभरातील साधकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. अमेरिकेहून आलेल्या या विद्यार्थ्याने कामठीच्या पावन भूमीत येऊन ध्यानधारणा केल्यामुळे, कामठीच्या आध्यात्मिक महत्त्वात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

नागपूर ते शेगाव सायकल वारी उत्साहात संपन्न

महिला सशक्तीकरण, बेटी बचाओ बेटी पढ़ाओ व पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश

नागपूर (दिलीप येवले) : द रॉक रायडर्स असोसिएशन नागपूर च्यावतीने आयोजित करण्यात आलेली नागपूर ते शेगाव सायकल वारी 14 ते 16 मार्च दरम्यान मोठ्या उत्साहात व यशस्वीरित्या पार पडली. समाजात महिला सशक्तीकरण, बेटी बचाओ बेटी पढ़ाओ आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने या वारीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला विविध मान्यवरांनी शुभेच्छा देत सायकलस्वारांचा उत्साह वाढविला. वारी दरम्यान सहभागी सायकलस्वारांनी शिस्तबद्ध पद्धतीने आणि उत्साहात प्रवास पूर्ण केला. या वारीत एकात्मता, फिटनेस



आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. वारीच्या पहिल्या दिवशी अमरावती येथे शासकीय वसतिगृहात सायकलस्वारांनी विश्रांती घेतली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी नव्या जोमाने शेगावकडे प्रस्थान करण्यात आले. सुमारे सायंकाळी ७ वाजता सर्व सायकलस्वार शेगाव येथे पोहोचले. तेथे श्री गजानन महाराजांचे दर्शन घेऊन सर्वांनी आध्यात्मिक समाधान अनुभवले व विश्रांती घेतली. पुढील दिवशी परतीचा प्रवास सुरक्षितपणे पूर्ण करण्यात आला. ही वारी केवळ प्रवास न राहता सामाजिक संदेश देणारा आणि प्रेरणादायी उपक्रम ठरला. सहभागींच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान हीच या वारीची खरी यशोगाथा ठरली.वारीमध्ये सहभागी सायकलस्वार :साधनाताई पापडकर, संजय धरमठोक, सुनिल दिकोंडवार, योगिता बरडे, संजय घुगल, प्रिती जाधव, अमोल ढोबळे, दिलीप वरकड, दिलीप बिरे, सारंग पन्डे, डॉ. सुषमा खंडागळे, जयंत मेंढी, भावना, आशिष पटले, मनोज जाधव, योगेश पापडकर, विष्णू शेंडे, यश गुगल यांची उपास्थिती होती.

बहुजन समाजाचे कयवारी थोर समाज सुधारक बहुजन नायक मान्यवर कांशीराम साहेब यांच्या ९२व्या जयंती मोठया हर्षउल्हास मध्ये साजरी करण्यात आली

आष्टी तालुका प्रतिनिधी (शरद शेंद्रे) अमरावती आणि आजाद समाज पार्टी (कांशीराम) पक्षाच्या ६व्या वर्धापण दिनाच्या निमित्यावर दि. १५ मार्च २०२६रोजी आजाद समाज पार्टी (कांशीराम) चे संस्थापक अध्यक्ष :-नगीना खासदार ऍड, मा. भाई चंद्रशेखर आजाद यांच्या आदेशाने व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. मनिष भाऊ साठे यांच्या नेतृत्वात मा. उमेश गणेशराव दुर्योधन यांच्या सामाजिक आणि जनसामान्य जनतेच्या



मदतीला धावून येण्याच्या ऋतिला व जनसामान्य लोकांच्या न्यायिक हक्काच्या प्रश्नावर आवाज उचलण्याच्या कार्याला पाहता त्यांची अमरावती जिल्हा अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे... ही नियुक्ती मा. खासदार भाई चंद्रशेखर आजाद यांच्या आदेशानुसार मा मनिष भाऊ साठे (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष) यांच्या उपस्थिती मध्ये त्यांच्या जनसंपर्क कार्यालय येथे करण्यात आली. ही नियुक्ती आजाद समाज पार्टी च्या संघटनात्मक दृष्या मजबूती प्रधान करणारी ठरणार असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष यांनी दर्शवीला आहे नियुक्ती दरम्यान आजाद समाज पार्टी चे सर्व पदधिकारी उपस्थिती होते.. या प्रसंगी युवा शहराध्यक्ष नितीन रामभाऊ काळे आझाद समाज पार्टी याची उपस्थिती होती अशी माहिती सिद्धार्थ दामोधरे शहर मीडिया प्रभारी आझाद समाज पार्टी अमरावती यांनी दिली

लोणी मध्ये भव्य आरोग्य शिबीर संपन्न

कैलास गायकवाड लोणी प्रतिनिधी

लोणी ता. आंबेगाव येथे अनुगामी लोकराज्य अभियान (अनुलोम) व ग्रामपंचायत लोणी यांच्या माध्यमातून व डॉ.डी. वाय.पाटील आयुर्वेद हॉस्पिटल आणि समर्थ फौंडेशन पुणे यांच्या सौजन्याने बुधवार दि. १८/०३/२०२६ रोजी महादेव मंदिर लोणी येथे भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.प्रथमतः भारतमाता पूजन ,छत्रपती शिवाजी महाराज, आणि धर्मवीर छत्रपती संभाजीराजे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.मान्यवरांच्या सत्कार करण्यात आहे.शिरीष भालेकर (अनुलोम पुणे विभाग प्रमुख)यांनी अनुलोम संस्थेची माहिती व कार्यपद्धती याबाबत माहिती देऊन या आरोग्य शिबीरास शुभेच्छा दिल्या. या शिबिरास लोणीचे लोकनियुक्त सरपंच डॉ. सावळाभाऊ नाईक ,कविता हिंगे (सचिव महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा भाजपा),




सुरेश भुजबळ(अनुलोम शिरूर उपविभाग प्रमुख),किरण वाळुंज (भाजप पूर्व मंडल अध्यक्ष),अनिता डफळ(शिरूर उपविभाग संवादिनी),राजेंद्र वाळुंज उपसरपंचल,डॉ.मीरा खलते (मेडिकल ऑफिसर प्रा.आ.केंद्र.धामणी),डॉ.भास्कर भोसले , डॉ.चंद्रकांत देशमुख ,अरुण गोरडे पत्रकार, समाजभूषण कैलास गायकवाड, उद्योजक सुधीर सोनार, प्रसिद्ध निवेदक जगन लंके,गटप्रवर्तक शीतल काकडे,आरोग्य सेवक पांचाळ हे मान्यवर उपस्थित होते.यामध्ये एकूण १८९ जणांची तपासणी करण्यात आली होती.यामध्ये ६८ जणांना मोफत डोळे तपासणी करून त्यांना चष्मे देण्यात आले. तसेच २१ जणांचे मोतीबिंदू ऑपरेशन डी. वाय पाटील येथे येत्या सोमवारी मोफत होणार आहे व १० जणांचे (किडीस्टोन,फिशर)याचे ऑपरेशन मोफत होणार आहे.याच बरोबर बीपी,शुगर,ब्रेस्ट कॅन्सर,तोंडाचा कॅन्सर, सीबीसी,हिमोग्लोबिन, रक्त गट इ.तपासणी करण्यात आल्या.या शिबिराचे सूत्रसंचालन सचिन तागड (अनुलोम भागजनसेवक आंबेगाव व हर्षल सुतार यांनी केले.या शिबिराच्या व्यवस्था अमोल ढगे(अनुलोम मित्र),गोरक्ष भोजने,विजय आदक,अमित क्षीरसागर, गोरक्ष भोजने , सारिका रोडे(अनुलोम भाग संवादिनी आंबेगाव)आणि सौ.मोहिनी बांगर(अनुलोम भाग संवादिनी आंबेगाव) यांनी पाहिली.

शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल भगत यांचा राजीनामा राजीनामा दिल्याने एकच खळबळ

दै जनप्रभात उरण तालुका प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे

उरण दि १९

रायगड जिल्ह्यातील राजकारणाला वेगळेच वळण लागले असून शिवसेना पक्षाचे जिल्हाध्यक्ष अतुल भगत यांनी दिलेल्या राजीनामा मुळे राजकारणात मोठा स्फोट झाला आहे.रायगड जिल्ह्यातील शिवसेना (शिंदे गट) पक्षात मोठी खळबळ माजली असून, उरण विधानसभेचे माजी जिल्हाप्रमुख अतुल परशुराम भगत यांनी आपल्या पदाचा आणि पक्ष सदस्यत्वाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. उत्तर रायगडचे आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडून प्रत्येक वेळी होणाऱ्या मनमानी व हुकूमशाही कारभाराला कंटाळून आपण हा निर्णय घेत असल्याचे भगत यांनी स्पष्ट केले आहे. अतुल भगत यांनी आपला राजीनामा थेट शिवसेना पक्षप्रमुख आणि



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठवला आहे. या राजीनामा पत्रामुळे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.या पत्रात अतुल भगत यांनी अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. "आमदार महेंद्र थोरवे यांच्या जाचाला कंटाळून मी शिवसेना पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे," असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. पक्षात काम करत असताना अंतर्गत वादातून अतुल भगत यांनी हा टोकाचा निर्णय घेतल्याचे दिसून येत आहे. पक्षाचा राजीनामा दिला असला तरी, अतुल भगत यांनी एकनाथ शिंदे यांच्याबद्दल आदर व्यक्त केला आहे. आपला आदर सदैव माझ्या तसेच माझ्या सहकाऱ्यांच्या मनात कायम राहील आणि आपल्या नेतृत्वात काम करण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद, अशा शब्दांत त्यांनी शिंदेंचे आभार मानले आहेत.शिवसेना पक्षाचे कट्टर प्रामाणिक एकनिष्ठ शिवसैनिक, एकनिष्ठ पदाधिकारी म्हणून अतुल भगत सर्वांना सुपरिचित आहेत.उरण मतदार संघात शिवसेना पक्ष वाढविण्यात, शिवसेना पक्षाचा तळागात प्रचार व प्रसार करण्यात अतुल भगत यांचा सिंहाचा वाटा आहे. मात्र अतुल भगत यांनी राजीनामा दिल्याने याचा फटका भविष्यात उरण विधानसभा परिसरात शिवसेना पक्षाला बसण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तविण्यात येत आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने गुढीपाडवा उत्सव उत्साहात साजरा

दै जनप्रभात उरण तालुका प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे

गुढीपाडवा हा मराठी नववर्षाचा पहिला दिवस (चैत्र शुद्ध प्रतिपदा) असून वसंत ऋतूचे स्वागत करणारा आणि समृद्धीचे प्रतीक असलेला सण आहे. या दिवशी घरोघरी नवीन वस्त्र, कडुनिंब व फुलांनी सजलेले गुढी उभारून पुरणपोळीचा बेत करून आनंदोत्सव साजरा केला जातो. हा हिंदू धर्मातील साडेतीन मुहूर्तापैकी एक महत्त्वाचा मुहूर्त आहे. गुढीपाडवा हा एक भारतीय सण असून तो हिंदू दिनदर्शिका प्रमाणे चैत्रशुद्ध प्रतिपदेला महाराष्ट्रात साजरा



करतात शालिवाहन संवत्सराचा हा पहिला दिवस आहे. असा हा पवित्र सण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने दरवर्षी देशभरात सर्वत्र साजरा केला जातो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काही मोजकेच सण साजरे करतो त्यापैकी गुढीपाडवा हा एक सण आहे. उरण शहरातील देऊळवाडीतील श्री संगमेश्वर महादेव देवस्थान येथील श्री शंकराच्या मंदिरासमोरील मैदानात हा कार्यक्रम मोठा उत्साहात संपन्न झाला. यावेळी ध्वजवंदना , संघ प्रार्थना गीत,त्यानंतर सुभाषित,वचन सांगण्यात आले. श्रीपाद कातरणे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ देशभरात कोणकोणते कार्य सेवाभावी वृत्तीने करत आहे याची माहिती दिली त्यानंतर सर्वांनी एकमेकांचा परिचय करून घेतला व त्यानंतर कार्यक्रमाचा समारोप झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना राष्ट्रीय हिताचे,समाज हिताचे काम समाजात देशात करत असून राष्ट्राच्या प्रत्येक कार्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे.

जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत प्रज्वल हंकारे यशस्वी

कंधार ! संतोष कांबळे

जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत कंधार येथील गरुड झेप कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यामध्ये प्रज्वल मुरलीधर हंकारे (जि.प. केंद्र कन्या शाळा माळाकोळी) याने ९१.७५ टक्के गुण मिळवत नवोदय विद्यालय प्रवेशासाठी पात्र झाला आहे.तसेच या परीक्षेत साईराज तुळशीराम चितळकर (९१%), शौर्य उदयसिंग चव्हाण (९०%), कु. प्राची गोविंद जाधव (८२.५०%), शांभवी गुरुनाथ पेटकर (८१.२५%), देवपूजा ईश्वरी अशोक (७३.७५%), श्रीपाद बालाजी गुंडाळे (६५%) आणि ऋग्वेद राजू केंद्रे (६२.५०%) या विद्यार्थ्यांनीही यश मिळवले आहे.यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा कंधार येथील गरुड झेप क्लासेस च् वतीने दि १८ मार्च रोजी सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे संचालक माणिक बोरकर व रंजना लुंगारे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या यशामुळे परिसरात विद्यार्थ्यांचे कौतूक होत असून पालक वर्गातून समाधान व्यक्त होत आहे, गरुड झेप कोचिंग क्लासेसच्या गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनाचे कौतुक होत आहे.

चोरट्यानी केले बंद घराला टार्गेट

16 ते 17 लाखांचा ऐवज लंपास, सीसीटीव्हीत चोरटे कैद

तळेगाव शा. पंत दि. 18/3/2026

तळेगाव परिसरातील रामदरा येथे घडलेल्या धाडसी घरफोडी प्रकरणात चोरट्यांनी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने ही चोरी केल्याचे स्पष्ट झाले आहे. या घटनेत अंदाजे 16 ते 17 लाख रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश ठाकरे यांच्या घरी ही चोरी झाली. ठाकरे हे त्यांच्या नातेवाईकांच्या मय्यतीमुळे पत्नीसह मोर्शी येथे गेले होते. घराला कुलूप असल्याची खात्री झाल्यानंतर चोरट्यांनी मुख्य दरवाज्याचा कोंडा तोडून घरात प्रवेश केल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्ट दिसत आहे.घरात प्रवेश केल्यानंतर चोरट्यांनी सुमारे 63 ग्रॅम सोन्याचे दागिने आणि अंदाजे 7लाख पन्नास हजार रुपये रोख रक्कम असा एकूण 16 ते 17 लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली



असून त्यामध्ये चोरट्यांचे चेहरे स्पष्टपणे दिसत आहेत.विशेष म्हणजे, चोरट्यांनी या परिसरातील आणखी एका घराला आधी टार्गेट केले होते. त्या घरातील सी सी टी व्ही कॅमेरा तोडून घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला मात्र त्या घरात हालचाल दिसल्याने त्यांनी माघार घेतली. यानंतर त्यांनी ठाकरे यांच्या बंद घरावर लक्ष केंद्रित करून चोरी यशस्वी केली.घटनेनंतर पोलिसांनी डॉग स्क्वॉडला पाचारण केले होते. डॉग स्क्वॉडने काही अंतरापर्यंत माग काढत आधी टार्गेट केलेल्या घरापर्यंत धाव घेतली, मात्र त्यानंतर त्यांचा माग हरवला आणि ते पुन्हा घटनास्थळी परतले.दरम्यान, या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. याआधी तळेगावातील दोन जिनिंग फॅक्ट्रीमध्येही मोठ्या चोऱ्या झाल्या होत्या, मात्र त्या प्रकरणांचा अद्याप छडा लागलेला नाही. त्यामुळे चोरट्यांचे मनोबल वाढल्याचे दिसून येत आहे.गृह मंत्र्यांच्या जिल्ह्यात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. पोलिसांनी तत्काळ कारवाई करून आरोपींना अटक करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.सध्या पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास वेगाने सुरू केला असून या चोरीचा छडा केव्हा लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.सदरचा तपास ठाणेदार मंगेश भोयर यांचे मार्गदर्शनात पी एस आय किशोर खंडार, निखिल पाटील व पोलीस कर्मचारी करीत आहे.

कवठे येमाई परिसरात अवकाळी पावसाचा तडाखा; गारपिटीमुळे कांदा पिकांचे मोठे नुकसान

कवठे प्रतिनिधी/ धनंजय साळवे

महाराष्ट्रातील काही भागांत अवकाळी पावसाने हजेरी लावली असून शिरूर तालुक्यातील बेट भागालाही या पावसाचा जोरदार तडाखा बसला आहे. कवठे येमाई परिसरात गुरुवारी सायंकाळी अचानक गारपीट झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.गुरुवारी सायंकाळी चारच्या सुमारास वातावरणात अचानक बदल होऊन ढगांच्या गडगडाटासह अवकाळी पावसास सुरुवात झाली. काही वेळातच मोठ्या प्रमाणात गारांचा वर्षाव झाला. रस्ते, घरांची छते आणि



मोकळी मैदाने गारांनी पांढरी शुभ्र दिसू लागली होती.या अवकाळी पावसाने व गारपिटीने परिसरातील कांदा पिकांचे अतोनात नुकसान झाले असून काढणीस आलेला गहू, भाजीपाला, तरकारी यांनाही मोठा फटका बसला आहे. तसेच आंबा, कलिंगड, डाळिंब यांसारख्या फळ पिकांचेही नुकसान झाले आहे. मका पिकासारख्या चारा पिकांनाही याचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.दरम्यान, गुरुवारी कवठे येमाई येथे आठवडे बाजार असल्याने अनेक शेतकरी व व्यापाऱ्यांनी विक्रीसाठी आणलेल्या शेतमालाचेही नुकसान झाले. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली.गेल्या काही दिवसांपासून वाढत असलेल्या उष्णतेत या पावसामुळे तात्पुरता गारवा निर्माण झाला असला, तरी गारपिटीमुळे निर्माण झालेले संकट अधिक गडद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मार्च महिन्याच्या अखेरीस झालेल्या या अनपेक्षित गारपिटीमुळे स्थानिक नागरिकही आश्चर्यचकित झाले आहेत.

ठानेगावात शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी संपन्न

कारंजा प्रतिनिधी

हिंदुस्तान इन इनसेक्टीसाईड लिमिटेड(भारत सरकार उपक्रम) व महाराष्ट्र शेतकरी शेतमजूर विकास संस्था काटोल यांच्या संयुक्त विद्यमाने 'एकात्मिक किड व्यवस्थापनावर शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.हा कार्यक्रम डॉ आर जी सोमकुवर(माजी संचालक, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन अरविंद उपरीकर (जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वधी) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राध्यापक डॉ सतीश ढोके(सचिव, महाराष्ट्र शेतकरी शेतमजूर विकास संस्था, काटोल) यांनी स्वागताध्यक्ष म्हणून उपस्थित राहून कार्यक्रमाचे प्रास्ताविक मार्गदर्शन केले. कीड नियंत्रणाच्या आधुनिक पद्धती, रासायनिक औषधांचा योग्य वापर तसेच पर्यावरणपूरक



केले.कार्यक्रमात तज्ञ किटकशास्त्रज्ञ व कृषी तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना एकात्मिक किड व्यवस्थापन (IPM) या विषयावर सखोल उपाययोजनांबाबत माहिती देण्यात आली.हा कार्यक्रम ठाणेगाव येथील जगदंबा माता देवस्थान येथे मोठ्या उत्साहात पार पडला. परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी बंधू-भगिनींनी उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घेतला.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित शेतकऱ्यांना सुरक्षा किटचे वाटप करण्यात आले तसेच भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.कार्यक्रमाचे आयोजन सुयोग्य रीतीने पार पाडल्याबद्दल आयोजकांचे सर्व स्तरातून कौतूक करण्यात आले कार्यक्रमाचे सुत्र संचालन श्रीमती देवयानी लोखंडे यांनी केले असून कार्यक्रमाचे पस्ताविक प्रा. प्रमोद बागडे यांनी केले व आभार प्रदर्शन कुमारी दिपाली बावडे गांनी केले.